

# श्री साईलीला

जानेवारी किं. ५० पैसे १९६९.

# या अंकांत—


१ प्रिय वाचक—

२ एक महत्त्वाचा संदेश

३ श्रीसाईबाबांची शिकवण

४ संत सदाशिव–तपस्या
व जीवन-कार्य

५ व्यर्थ वणवण कशासाठीं !

६ निर्भयता

७ सर्व धर्मांचें सौंदर्य

८ तुकोबारायांच्या दोन
अभंगांचें निरूपण

९ सर्वत्र अध्यात्मदृष्टि असावी



# श्री साई वाक्सुधा

प्रत्येकजण माझ्याजवळ कांहीं ना कांहीं मागायला येतो. मी काय सांगतों त्याकडे मात्र कोणाचें लक्ष नसतें. माझ्यापाशीं खजिना अपरंपार भरलेला आहे. घर भरून दारानें बाहेर पडूं लागला आहे; परंतु त्याकडे कोणाचें लक्ष आहे का? संपदा आहे. ती जमिनीखालीं पुरलेली आहे. खणायची आणि बाहेर काढायची आणि गाड्या भरभरून घेऊन जायची ! परंतु हे श्रम करण्याची कोणाची तयारी आहे? प्रत्येकास आयतें व मेहनत केल्याशिवाय पाहिजे. तें कसं बरं मिळेल ?

—श्रीसाईचरित्र


## श्री साईलीला

[ शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक ]

वर्ष ४७ वें ] जानेवारी १९६८ [ अंक १० वा

: संपादक :

**श्री. द. दि. पाटणकर**

वार्षिक वर्गणी रु. ५ (ट. ख. सह)

**टे. नं ४४३३६१**

: कार्यालय :

**साईनिकेतन, डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ,**
**प्लॉट नं ८०४ बी, दादर, मुंबई १४.**

## प्रीय वाचक—

या जगांत प्रत्येकजण मायापाशांत गुंतलेला आहे. आणि तो पाश आहे म्हणून तर त्याच्याकडून इतरेजनांच्या बाबतीत जरूर तें कर्तव्याचरण घडत आहे. माया—मोह पसारा हा फुकट आहे; त्यांत गुरफटून जाऊन कोणीही स्वतःची हानी करून घेऊ नये असें सांगितलें जातें; परंतु सांगणारेही त्यांत गुरफटून गेल्याशिवाय रहात नाहींत. हें जें गुरफटणें तें हानिकारक नाहीं. तें कल्याणप्रद आहे. मात्र वेळ येईल तेव्हां त्या मायापाशापासून दूर सरण्याची किंवा सटकण्याची शक्ति आपण संपादन केली पाहिजे.

महर्षि अण्णासाहेब कर्वे हे केवढे भाग्यवंत कर्मयोगी ! स्त्रीजन्माचें सार्थक करण्याचें थोर भाग्य त्यांच्या वाट्यास आलें. त्यांची ही सेवा अतुलनीय स्वरूपाची आहे. उतार वयांत पत्नी निधनाचें दुःख त्यांच्या वाट्यास आलें. तेव्हां सर्वांना सोडून दूर एका झाडाखालीं जाऊन ते बसले व मनसोक्त रडून त्यानीं दुःखाला वाट करून दिली असें सांगतात. कोणी कितीही मोठा व श्रेष्ठपदाला पोहोंचलेला कर्मयोगी असो; वियोगदुःख त्याला जाणवल्याशिवाय राहात नाहीं. दुःख हें विवेकानें आवरायचें असतें; परंतु तें केव्हां ? मागाहून, श्रीसाईबाबा हे थोर अवतारी महापुरुष. जगाच्या कल्याणा, संतांच्या विभूती. अशा थोर कोटींत त्यांची गणना; परंतु त्यांना तरी मायेनें कोठें मोकळें सोडलें होतें ? सारी जनता, आपले सारे भक्त हेंच त्यांचें कुटुंब होतें. त्यांच्या कल्याणासाठीं व भल्यासाठी त्यांचा जीव तीळ तीळ तुटत असे. भक्तांचें दुःख तें आपलेंच दुःख असें मानून तें दूर करण्यासाठीं झटण्यांत त्यांना आनंद वाटत असे.

बाबा म्हणतात—'माया आहे फार कठीण । तिणें केलों मी हीन दीन । माझिया माणसांची रात्रंदिन । घोकणी करून असतों मी '॥

बाबांचा पसारा फार मोठा होता. त्याला सीमा नव्हती. तो अपरंपार होता. ते विश्वप्रेमी होते. सर्वांच्या कल्याणासाठीं झटणारे व सर्वांसाठीं रात्रंदिन चिंता करणारे होते. त्याचप्रमाणें आपणही 'हें विश्वचि माझें घर' असें मानून सर्वांवर माया ममता करायला शिकलें पाहिजे. केवळ आपल्या घरादारापुरती मायाममता न ठेवतां तिचा व्याप घराबाहेर चौफेर झाला पाहिजे. अशा रीतीनें सर्वांसाठीं झटून सर्वांच्या प्रेमादरास पात्र होणें ,यांतच मानवजन्माचें सार्थक आहे.

—संपादक

# जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति

## संत सदाशीव; तपस्या व जीवन कार्य

लेखक :- पु. बा. कुलकर्णी

कावेरी नदीच्या तीरावर नेरूर या नावाचें एक लहानसें परंतु सृष्टिसौंदर्यानें अत्यंत आकर्षक असें एक खेडें आहे. सृष्टिदेवतेचा त्या गावांवर वरदहस्त आहे. त्या गावांतील झाडीझुडपांत दडलेलें असें एक शिवमंदिर आहे. बिल्ववृक्षाने त्या मंदिरावर आच्छादन घातलें आहे.

ज्या संत सदाशिवाचा येथें अल्प परिचय करून देण्यांत येत आहे, त्या सदाशिवाचें हें आवडतें स्फूर्तिस्थान.

**पूर्वैतिहास**

कावेरी नदीच्या काठीं तिरुवसनाळूर या नावाचें एक टूमदार गांव आहे. साधू सदाशिवाच्या जन्मानें तें पुण्य पावन झालें आहे. त्याचे वडील सोमसुंदर हे एक धर्मनिष्ठ ईश्वरभक्त व पवित्र पंडित होते. आईचें नाव होतें पार्वती. तीही धर्मनिष्ठ व जुन्या परंपरेंत वाढलेली होती.

'जानकी परिणयम्' या संस्कृत काव्याचे अधिकारी लेखक रामभद्र यांच्या नेतृत्वाखालीं सदाशिव संस्कृत शिकला व ग्रंथवाचन करूं लागला. सदाशिवाला अल्पवयी असतांच काव्य करण्याची स्फूर्ति झाली. रसाळ व गोड काव्यें त्याच्या मुखांतून बाहेर पडूं लागलीं. बालपणींच दिव्य काव्यप्रतिभेचा त्याला लाभ झाला. गोपाळकृष्ण व व्यंकटेश दीक्षीत हे दोघे त्याचे सवंगडी. तेही पुढें नांवारूपास आले. त्यानीं गायनाच्या रूपानें सदाशिवकाव्यांचा चांगलाच प्रचार केला देवाचें स्मरण सतत करा. सारीं बंधनें तोडून मुक्त व्हा. निर्भयतेनें जगांत संचार करा. देवत्व संपादन करणें हा तुमचा जन्मसिद्ध हक्क आहे. तो प्राप्त करून घेतल्याशिवाय स्वस्थ राहूं नका.

अशा प्रकारच्या विचारांनीं त्याचीं काव्यें समृद्ध आहेत. श्रोत्यांना तीं आवडूं लागली.

### देवाकडे लक्ष

सदाशिवाचें लक्ष लागून राहिलें होतें देवाकडे. त्याला घरापासून व नातलगांपासून सुटका करून घ्यायची होती. तो त्या संधीची वाट पहात होता; परंतु तो दिवस त्याच्यापासून दूर दूर पळत होता. आईवडिलांच्या मर्जीखातर तो विवाहबद्ध झाला. ज्यानीं जन्म दिला त्यांचा शब्द त्याच्यानें मोडवेना. त्याचें जिच्याशीं लग्न लागलें होतें ती वयांत आली तेव्हां नातलगांस पाचारून त्या निमित्त मोठा सोहळा करण्यांत आला. एकीकडे भोजनासाठीं पंचपक्वान्नांची तयारी जोरांत चालू होती. दुपार टळून गेली तशी सदाशिवाला भूक लागली. त्याची बायको स्वयंपाकाच्या ज्या एका खोलींत कांही तरी पक्वान्न करण्यांत गुंतली होती, त्या खोलींत सदाशिवनें प्रवेश केला.

### मला भूक लागली आहे

"भूक लागली आहे ! मला दे कांहीं तरी खायला"

"अहो ! थांबा ! शिवाल अन्नाला. नका आत येऊं बाहेरच वाट पहा !"

तेथें काम करण्यांत गुंतलेली कोणी एक स्वयंपाकीण म्हणाली.

खाण्याच्या पदार्थापेक्षां अशाच शब्दांची सदाशिवला गेल्या किती तरी दिवसांपासून भूक लागली होती. त्याचें काम झालें. जें हवें हवेंसें वाटत होतें तें त्याला अचानकपणें मिळालें. "आंत प्रवेश करूं नका ! बाहेरच्या बाहेर वाट पहात रहा !"

ते शब्द देवाचे शब्द मानून सदाशिवनें ते मस्तकीं धारण केले.

त्यावेळीं तो स्वतःशींच काय म्हणाला माहीत आहे ?

### आत्मारामाची भूक

सदाशिव म्हणाला होता– होय. मला कुटुंबापासून, या घरापासून दूर कुठें तरी जायचें आहे. नको मला हें कौटुंबिक जीवन ! माझ्या आत्मारामाला जी भूक लागली आहे ती शांत करून घेण्याचें हें स्थान नव्हे. तें दुसरीकडे कुठें तरी आहे. आतां मला तें शोधून काढायचें आहे. तेव्हां याचक्षणीं बाहेर पडावें त्या शोधासाठीं.

सदाशिवानें त्याचक्षणीं गृहत्याग केला आणि तो तीरासारखा वेगानें धांवत पळत एका जंगलांत प्रवेश करता झाला. तेथें त्याला, आंत प्रवेश करूं नका, असें बजावणारा कोणीही नव्हता.

आणि मग त्याच्या पत्नीचें काय झालें ? तपास चालू होता. सदाशिव गेला तरी त्याचीं भजनगीतें मागें होतीं. मदुरा येथें वास्तव्य करून सदाशिवाची पत्नी त्याचीं गीतें आळवीत व पतिराजांचें स्मरण करीत आयुष्यभर राहिली. कोणामुळें कोणाला परम दुःख होतें; आणि तें शमन करण्याचा उपाय दयाळू ईश्वर या नाहीं त्या रूपानें सुचवीतच असतो.

## स्वैरपणें भटकणें

सदाशिव सर्व पाशांतून मुक्त झाल्यानंतर जंगलदऱ्यांतून स्वैरपणें भटकूं लागला. 'शिवोहं' हा एकमेव मंत्र त्याच्या मुखीं त्याकाळीं सदासर्वकाळ असे. दोन हातांत न मागतां कोणी कांहीं टाकलें तर तें खायचें आणि परत जंगलांत जाऊन रहायचें, हा त्याचा अनेक वर्षें नित्यक्रम होऊन राहिला होता.

एके दिवशीं 'कुंभकोणम्' पीठाच्या शंकराचार्यांस सदाशीव याचा शोध लागला. त्यांना त्यांची जरूरी होती. विनवण्या करून त्यांना त्यानीं आणविले व आपल्या सहवासांत ठेविलें. सदाशीवाला त्यानीं शास्त्रीयदृष्ट्या तपस्येची जरूर ती माहिती करून दिली व त्याना शिस्तबद्ध केलें.

आपल्यामागें आपल्या गादीवर त्यानीं आरूढ व्हावें अशी शंकराचार्यांची फार इच्छा होती. सदाशिव यानीं शंकराचार्यांची सेवा मनोभावें केली. त्यांत काडीचीही कसूर होऊं दिली नाहीं. परंतु त्यांची गादी स्वीकारण्यास नकार दिला. त्यांना तो जंजाळ नको होता. त्याच्या पलीकडे ते पोहोंचले होते. त्यांना कोणत्याही बंधनांत रहाणें कसें आवडेल ?

## महत्वाचें लेखन

सदाशिव यानीं कांहीं अध्यात्मिक लेखनही केलें. त्यानीं ब्रह्मसूत्रें व राज-योग याबर टीका लिहिल्या. याच काळांत त्यानीं ' आत्मविलासम् ' या नावाचा अत्यंत महत्त्वाचा ग्रंथ निर्माण केला. तो थोरामोठ्यांच्या अत्यादरास पात्र होऊन राहिला आहे. या काळांत त्यानीं भक्तिपर काव्यरचनाही बरीच केली.

या काळांतील दुसरी एक घटना म्हणजे ठिकठिकाणचे विद्वान व पंडित सदाशिवाशीं गहन आध्यात्मिक विषयांवर चर्चा करण्यासाठीं त्यांच्याकडे येत असत. त्यांचे कोटिक्रम बिनतोड व निरुत्तर करणारे असत. त्यामुळें प्रत्येक वेळीं विजयमाळा त्यांच्याच गळ्यांत पडत असे. शास्त्री पंडितांना त्यांचा हेवा वाटायचा.

कधीं कधीं वादविवाद भयंकर रंगायचे. व विकोपालाही जायचे, अशा वेळीं गुरुजीनीं म्हणावें "सदाशीव ! शांतम् ! शांतम् ! " आणि मग काय ? सदाशिवांची एकदम समाधी लागायची ! नंतर त्यानीं वादविवाद करण्याचें अजिबात सोडून दिलें.

## दिगंबर अवस्था

यानंतरच्या काळांत सदाशिवानीं अंगावरील कपड्यालत्त्यांचा त्याग केला. पंचा किंवा लंगोटीचा सुद्धां ! तशा त्या दिगंबरावस्थेंत वाटेल तिकडे फिरतांना पाहून लोक त्यांना वेडा म्हणू लागले. पोरें त्यांच्या मागें धाऊं लागलीं व त्यांना सळो का पळो करूं लागलीं. परंतु त्यानीं कोणालाही कधीं प्रतिकार केला नाहीं. कित्येक पंडित त्यांचा द्वेष करू लागले. त्यांची निन्दा करूं लागले; परंतु त्यानीं यानंतरच्या काळांत कोणालाही उत्तर देण्याचा कधीं प्रयत्न केला नाहीं.

त्यांना विरोधकही लाभले होते. त्यानीं त्यांच्या गुरुजींजवळ तक्रार केली कीं सदाशिव वेडा झाला आहे ! तो नग्नावस्थेंत फिरतो.

यावर गुरुजी काय म्हणाले ? ते म्हणाले " त्यांच्यासारखा मी वेडा होईन तो माझ्या भाग्याचा दिवस म्हणावा लागेल ! "

जीं जाणकर माणसें होतीं त्यानीं सदाशिवाचें कौतुक केलें व ते त्यांच्याकडे प्रेमादराच्या भावनेनें पाहूं लागले.

## एकांतवासाचे दिवस

कोणी निंदा कोणी वंदा. सदाशिवजीनें त्याची कधींही फिकीर बाळगली नाहीं. त्यानी स्वहित कशांत आहे हें बरोबर ओळखलें होतें. नंतर जगाशीं संबंध न ठेवतां ते एकांतवासांत काळ कंठूं लागले. सर्प आपल्या अंगावरील कात फेकून देतो त्याप्रमाणें आपल्या देहाला ते साफ विसरून गेले. आपण देहधारी आहोंत, हें भान त्यांच्याठायीं राहिलें नाही. ते सतत समाधि अवस्थेंत वावरूं लागले.

एकेदिवशीं कावेरी नदीच्या काठीं कोडुमुडी या नावाचें एक स्थान आहे. तेथील वाळूंत ते समाधि अवस्थेंत पडून होते. जोरजोराची पर्जन्य वृष्टि सुरू झाली. पाण्याचे लोट वाहूं लागले. त्या लोटांत ते वाहून गेले व कुठें तरी एकाएकीं गडप झाले ! लोकांना वाटलें सदाशिवांचा अवतार समाप्त झाला.

### वाळूंत गडप

नंतर एके दिवशीं झगझगीत ऊन पडलें होतें. नदीच्या काठीं असलेल्या वाळूंत कुदळी फावडी घेऊन शेतकरी खणत होते. एका शेतकऱ्याच्या फावड्याला खणतां खणतां रक्त लागलें. त्याला मोठें आश्चर्य वाटलें. त्यांनीं हातांनीं धूळ उपसली आणि पहातात तों काय ? सदाशिव ताडकन् उठून त्यांच्या पुढ्यांत उभे ! त्यांचें तें तेजस्वी ध्यान पाहून सर्वांना आश्चर्य वाटलें. एक शब्दही न बोलतां तेथून शांत गंभीरपणें चालत ते निघून गेले !

भाताचें शेत कापणीचा हंगाम होता. एका ठिकाणीं भाताचे पेंढे एकावर एक रचून ढीग करून ठेवण्यांत आले होते. रात्रीच्यावेळीं सदाशीव विश्रांती-साठीं त्या ढिगाऱ्यावर आडवे पडून राहिले होते. पहांटे फिरत फिरत पहारेकरी हातांत काठ्या घेतलेले तेथें येऊन थडकले ! कोणी तरी चोर भाताच्या पेंढ्यावर झोपला आहे असा त्यांचा समज झाला. त्यानीं सदाशिवला काठ्यांनीं झोडपून काढलें ! त्यानीं माराचा प्रतिकार बिलकूल केला नाहीं. त्या मारेकऱ्यांचे हात एकाएकीं हालचाल करीनासे झाले. हात पुढें होईनात मागें जाईनात. त्यांना दगडांची कळा आली ! सदाशिव उठून शांतपणें तेथून जाऊं लागले तेव्हां मारेकऱ्यांच्या लक्षांत आलें कीं आपण चोर समजून एका सत्पुरुषाला झोडपण्या-चें पाप केलें. त्यानीं गयावया करून सदाशिवाची क्षमा मागितली. तेव्हां त्या मारेकऱ्यांचे हात हालचाल करण्यास समर्थ झाले !

एके ठिकाणीं लढाईच्या पूर्वतयारीसाठीं सैन्याचा जमाव एकत्र झाला होता. निर्भय सदाशिव त्या सैनिकांतून जाऊं लागले. तेव्हां सैन्यांतल्या कॅप्टननें त्यांना पकडलें व त्यांच्या डोक्यावर जळाऊ लाकडांचे भारे चढवून ते बराकींत नेऊन पोहोंचविण्याची शिक्षा त्यांना फर्माविली.

सदाशिवानें मुळींच न रागवतां दिलेले भारे बराकींत पोहोंचविले; परंतु तेथें काय झालें ? त्या लाकडांनीं पेट घेतला आणि तो सैन्याचा कँप अग्निनारा-यणानें जाळून भस्म केला.

### सदाशिवाचा नग्नवेश

एकदां ते एका मुस्लीम सैन्याधिकाऱ्याच्या नजरेस पडले. माझ्या समोरून एक नागडा उघडा माणूस जातो म्हणजे काय ? त्याला आठवण राहील अशी चांगली शिक्षा ठोठावली पाहिजे असें त्यानें मनाशीं ठरविलें. आणि योग्य वाटली ती शिक्षा त्यानें तत्काळ अंमलांतही आणिली.

कोणती शिक्षा ठोठावली ? आपल्या हातांतील तरवारीनें त्यानें सदाशिवांचा एक खांदाच छाटून टाकिला ! भळभळ रक्त वाहूं लागलें ! सदाशिवानें त्याकडे लक्ष दिलें नाहीं. एक शब्दही बोलले नाहींत. तो अधिकारी आश्चर्यानें थक्क झाला.

सदाशीव तेथून वेगानें जाऊं लागला. त्याबरोबर तो अधिकारी त्यांच्या मागून धांवत सुटला व हातापायां पडून त्यांची क्षमा मागूं लागला. तेव्हां कुठें त्या सतपुरुषाला आपल्यास झालेल्या जखमेची जाणीव झाली ! त्यानीं तिला हळुवार हात लावतांच जखम भरून आली. जणूं काय कांहींच घडलें नव्हतें.

त्या अधिकाऱ्यानें तो प्रकार पाहून सदाशिवापुढें साष्टांग प्रणिपात केला. व गुणवर्णन सुरू केलें. सदाशिवांचें त्यांच्या बोलण्याकडे लक्ष कुठें होतें ? अत्यंत शांतपणें व हंसतमुखानें ते तेथून निघून गेले.

**मुलावाळांची आवड**

थोरामोठ्यांना सदाशिवच्या थोरपणाची जाणीव होऊं शकली नाहीं. मग मुलाबाळांचें काय सांगावें ? एकदां कांहीं वात्रट मुलांनीं सदाशीव हा एक वेडगळ प्राणी आहे या समजुतीनें त्यांच्या मागें पिसाळलेला कुत्रा छू करून लावून दिला. कुत्र्याला काय समजतें ? तो पिसाळलेला कुत्रा सदाशीवाच्या अंगावर धांऊन गेला व त्यानें त्यांच्या पायाचा कडकडून चावा घेतला. तो त्यांचा पाय सुजला व त्यांत किड्यांनीं घर केलें. परंतु त्यांनीं त्याची पर्वा केली नाहीं. हा आपला व त्या किड्यांचा कर्मभोग आहे असें त्यानीं मानिलें. तो त्यांचा पाय आपोआप बरा व्हायचा तेव्हां झाला. परंतु त्या वेदना त्यानीं निमूटपणें सहन केल्या.

आपल्या जखमेची त्यानीं पर्वा केली नाहीं; परंतु दुसऱ्यांच्या जखमा व दुःखें दूर करण्यासाठीं मात्र ते जीवेंभावें झटले ! त्यांच्या दृष्टींत तेज होतें. अमृत होतें. केवळ दृष्टीपातानें ते दुसऱ्यांची दुःखें बरीं करीत असत. एकदां एका मुलास सर्पदंश झाला व तो त्यांत मरण पावला. त्याच्या आईवडिलांचें दुःख दूर करण्यासाठीं सदाशीवानें त्याला जिवंत केलें !

सदाशीवाला मुलांची भारी आवड. निष्पाप मुलें म्हणजे सुंदर फुलें. त्याला त्यांचें भारी आकर्षण वाटायचें. त्यांच्याबरोबर ते मुक्तपणें खेळायचे. त्यांनीं संपादन केलेलें अध्यात्मिक नि दैवी सामर्थ्य दांडगें होतें. एकदां मदुरा येथील मंदिरांत महोत्सव चालू होता. मोठी जत्रा भरली होती.

**आणखी कांहीं चमत्कार**

बाळांनो ! येतां का मदुरेच्या जत्रेला ? " सदाशीवनें वीचारलें. " हो !

हो! पण मदुरा किती लांब आणि आमच्याजवळ पैसे तरी कुठें आहेत."
"त्याची नका काळजी करूं. तें मी पाहीन"

बोलतां बोलतां साऱ्या मुलांसह सदाशीव मदुरेला जाऊन पोहोंचले! त्या उत्सवाची मौज त्यांना दाखविली, प्रत्येकाला प्रसादही देवविला आणि थोड्याच अवधींत त्यांना परत त्यांच्या नेरूरगावीं सुरक्षीत आणून सोडलें. त्या मुलांनीं आपापले अनुभव आईवडिलांस सांगितले तेव्हां त्यांना आश्चर्याचा धक्का बसला असल्यास नवल नाहीं.

पदुकोटा या संस्थानाचें नाव पुष्कळांनीं ऐकलें असेल. ही सुमारें सव्वा दोनशें वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. त्याकाळीं पदुकोटाच्या आसपास मोठमोठीं जंगलें होतीं. त्यांपैकीं एका जंगलांत सदाशीवचें वास्तव्य कांहीं काळ होतें.

त्या संस्थानचा कब्जा मिळविण्यासाठीं त्याकाळीं मुसलमान व मराठे एकमेकांशीं झगडत होते. राजाचें नाव होतें विजय रघुनाथ. तो मोठ्या पेचांत सांपडला होता. त्याला मूलबाळ कांहीं नव्हतें. तेंही होतें त्याचें एक परम दुःख. त्या राजानें या पेचप्रसंगांतून कसा मार्ग काढला पहा!

**राजाची शरणागती**

संत सदाशीवास शरण जाण्याचा सल्ला राजाला कोणी तरी दिला. त्याचे दुर्दिन संपत आले होते. राजाने सदाशीवाचा शोध लावून तो त्यांना मनोभावें शरण गेला. सदाशीवानें त्याच्या पाठीवरून हात फिरवीला आणि सांगितलें कीं गोरगरीबांस मुक्त हस्तांनी दे. देवाची आठवण ठेव. त्याची भक्ती कर. गोरगरीबांस अन्नदान कर. विद्वानांचा परामर्ष घे. धर्मबाह्य वर्तन करूं नकोस. राजाला उद्देशून या आज्ञा सदाशीवानें सभोंवारच्या वाळूवर लिहिल्या. राजानें त्या लक्षपूर्वक वाचल्या व त्या त्यानें मोठ्या श्रद्धायुक्त अंतःकरणानें अंमलांत आणिल्या. आणि काय केलें? अक्षरांसह ती वालुका त्यानें जशीच्या तशी संभाळिली. त्याला देवस्थानचें स्वरूप प्राप्त झालें.

**लोण्याचा प्रसाद**

राजाची इच्छा ओळखून सदाशीवानें त्याला बचकाभर लोणी दिलें. राजानें आपल्या राणीसह तें भक्षण केलें. महिने पूर्ण होतांच राणीसाहेब बाळंत झाल्या. पुत्ररत्न झालें. त्याचें नाव ठेवण्यांत आलें नवनीत. नवनीत म्हणजे लोणी हें का सांगितलें पाहिजे?

पदुकोटामध्यें सदाशीवाना त्यामुळें बहुमानाचें स्थान प्राप्त झालें. तें त्यांना नको होतें. तें आपोआप त्यानां येऊन चिकटलें.

ज्या ठिकाणीं संत सदाशीवांचें वास्तव्य होतें तेथें एक मंदिर उभारण्यांत आलें. तेथें दर शुक्रवारीं मोठ्या समारोहानें पूजाअर्चा होऊं लागली. हजारो गोरगरीबांस त्या दिवशीं अन्नवस्त्र देण्यांत येऊ लागलें. कलावंत पंडित व विद्वान् यांचा मानसन्मान होऊं लागला.

सदाशीवाच्या कृपेनें राजा संकटमुक्त झाला. वर्षामागून वर्षे लोटलीं. एक राजा गेला व त्याच्याजागीं दुसरा आला; परंतु सदाशिवाच्या आज्ञ पाळण्यांत आजवर कोणीही कसूर केली नाहीं.

सध्यांच्या बदलत्या काळांतही सदाशिवाच्या नेरूरगांवी त्यांच्य संस्मरणार्थ प्रतिवर्षी मोठी जत्रा भरत असते व हजारो लोक त्या उत्सवांत भक्तीभावानें भाग घेत असतात.

जीवन हें परोपकारासाठीं, दुसऱ्यांचें दुःख निवारण करण्यासाठीं आहे. केवळ स्वतःच्या सुखोपभोगांसाठीं नाहीं. ज्यानीं हें ओळखलें ते धन्य होत. सदाशीवासारख्या संतांचा जन्म परोपकारासाठीं असतो. तेंच त्यांचें ध्येय असतें. सदाशीवापुढें तेंच ध्येय होतें. तें शांतपणें व कोणावरही रागरोष न करतां त्यानी पूर्ण केलें. ते एकाच ठिकाणी बसून राहिले नाहींत. संधी सांपडली त्या त्यावेळीं भारत, सीलोन एवढेंच नव्हे तर अफगाणिस्थान व इराण ह्या दूरच्या देशांनाही भेटी देऊन आले. सारा पायीं प्रवास ! आतां आपले कार्य संपवून निजधामास गेलें पाहीजे असें वाटतांच एका बिल्व वृक्षाखालीं त्यानीं महासमाधी घेतली. निर्याणप्रसंगी अवध्या ४।५ वाक्यांत त्यानीं जवळच्या लोकांना आपल्या जीवनाचें सार सांगितलें.

**शेवटचा संदेश**

तें शेवटीं म्हणाले, "देवावर संपूर्ण श्रद्धा ठेवा. त्याला सर्वस्व अर्पण करा. त्याची इच्छा प्रमाण माना. सुख आणि दुःख हें त्याच्या इच्छेनुरूप वाट्यास यायचें. तो ठेवील त्या स्थितींत समाधान माना. त्याच्या कृपेसाठीं आपलें हृदय-कमल सदा प्रफुल्लीत ठेवा. स्वयंकेंद्रीत व्हा. सत्याची कांस कोणत्याही परिस्थि-तींत सोडूं नका. शेवटीं जय व्हायचा तो त्याचाच. तें सत्य तुमचें रक्षण करील. त्याचें ध्यान,त्याचें स्मरण केल्यामुळें मिळणाऱ्या आनंदाला कधींही पारखे होऊं नका."

( —योगी शुद्धानंद भारती यांच्या एका लेखाच्या आधारें. )

# एक महत्त्वाचा संदेश

प्रेषक—**स्वामी केशवय्या**

**श्री साईबाबांच्या सुवर्ण महोत्सवी पुण्यतिथीनिमित्त जसे शिर्डी व मुंबई येथें भव्य समारंभ झाले त्याच प्रमाणें मद्रास, बंगलोर, कोईमतुर वगैरे ठिकाणीं असलेल्या श्री साईमंदिरांतून झाले. मद्रास येथील सुवर्ण महोत्सवप्रसंगीं तिकडील एक थोर साईभक्त स्वामी केशवय्या यानीं जो संदेश पाठविला तो तिकडील आकाशवाणीद्वारें ध्वनिक्षेपित करण्यांत आला, आमच्या वाचकांसाठीं त्याचा सारांश पुढें देण्यांत येत आहे.**

साधुसंतांच्या वास्तव्यानें पुण्यपावन झालेला असा हा भारत आहे. जनतेंत दैवी संदेश पसरविण्यासाठीं व मानवजातीची दुःखतापांपासून मुक्तता करण्यासाठीं साधुसंतांच्या रूपानें भगवान या अवनीतलावर वेळोवेळीं अवतार घेऊन येत असतो.

भगवंतानें गीतेंत सांगून टाकिलें आहे कीं " मी जन्मातीत, रंगरूपातीत असलों तरी मानव जातीसंबंधानें वाटणाऱ्या अनुकंपेमुळें मी वेगवेगळ्या रूपानें या भूतलावर अवतीर्ण होत असतो. ज्या ज्या वेळीं सद्गुणांचा लोप होऊन दुर्गुणांचें प्राबल्य माजूं लागतें, नीतीची जागा अनीतीनें बळकाविली जाते, त्या त्यावेळीं धर्माचें व नीतीचें राज्य प्रस्थापित करण्यासाठीं मी मानव रूपानें जन्म घेत असतों. मला दुष्टांचें निर्दाळण करून धर्माचें राज्य प्रस्थापित करावयाचें असतें. त्यासाठीं मी युगायुगांतून वेगवेगळ्या रूपांनीं या जगांत आलों आहें. " श्रीसाईबाबा हे अशा अवतारी महापुरुषांपैकीं एक आहेत.

अहमदनगर जिल्ह्यांतील एका खेड्यांत साईबाबा एका सोळा वर्षें वयाच्या मुलाच्या रूपानें अवतीर्ण झाले. त्यांचा जन्म केव्हां व कुठें झाला व त्यांचे आईबाप कोण होते हें आजवर निश्चितपणें कोणालाही सांगतां आलें नाहीं. तें अजूनही एक गुपितच आहे. एक षोडश वर्षीय मुलगा या नात्यानेंही त्यानीं जवळपासच्या लोकांनीं थक्क व्हावें असे गुण प्रकट केले. अध्यात्मिकदृष्ट्या ते

परिपूर्णतेला पोहोंचले होते. त्यामुळें त्यांच्याठायीं कितीतरी दैवी गुणांचा समन्वय सहाजिकपणें झालेला होता. लोकांनीं देवावर श्रद्धा ठेवावी व त्याची भक्ति करावी या हेतूनें त्यानीं प्रसंगोपात्त कितीं तरी चमत्कार करून दाखविले. लोकांचीं दुःखें नानाप्रकारचीं होतीं. कोणाला काय तर कोणाला काय हवें होतें. त्यांना जें जें हवें होतें तें तें त्यानीं त्यांच्या पदरांत टाकलें परंतु त्यांत त्यांचा एक अंतिम हेतू होता. तो कोणता ? आपल्याकडे येणाऱ्या भक्तांनीं ईश्वराभिमुख व्हावें, त्यानीं भगवंताची भक्ति करून आपलें कोटकल्याण करून घ्यावें.

साठ वर्षपेक्षां अधिक काळ त्यांचें शिरडींत वास्तव्य होतें. त्याकाळांत हजारों लोंकांचीं दुःखें व त्यांच्या वाट्यास आलेलें दैन्य दूर करण्याचा उद्योग त्यानीं अखंड चालविला होता. त्यांची भक्तिभावाची शिकवण देशाच्या निरनिराळ्या भागांत वाऱ्याप्रमाणें पसरत गेली. त्यामुळें असंख्य लोकांचीं दुःखें दूर झालीं. दुःखितांना जरूर असलेला दिलासा व आसरा मिळाला. ते देहधारी होते त्याकाळांत त्यांच्या भक्तांनीं देवसदृश श्रद्धा त्यांच्या ठायीं ठेविलीं व त्यांची कृपा संपादन करून आपापलें कल्याण करून घेतलें. जे जे कोणी साधक या नात्यानें त्यांच्या सन्निध आले, त्यांचा मार्ग बाबांच्या शब्दानें व प्रेरणेनें निष्कंटक झाला. बाबांनीं नश्वर शरीराचा त्याग केल्यानंतर तरी काय ? पडद्याआड राहून, अदृश्य रूपानें त्यानीं आपल्या प्रेमळ भक्तांचें पूर्वींप्रमाणेंच मार्गदर्शन केलें व आजही करीत आहेत. त्यानीं महासमाधि घेतल्यास पन्नास वर्षांचा काळ मागें पडला आहे. अशावेळीं त्यांच्या उज्ज्वल व कल्याणकारक शिकवणुकीचा आपण विचार व आचार करणें अत्यंत जरूर आहे.

साईबाबांची शिकवण अत्यंत साधीसुधी व आचरणांत आणण्यास सुलभ आहे. आपल्या भक्तांना त्यांच्या कल्याणाच्या दृष्टीनें त्यांनीं जें कांहीं सांगितलें त्यांत अवघड किंवा समजण्यास कठीण असें कांहीं नाहीं. आपल्या उद्योगांत सतत रहाणें, ज्ञान संपादन करणें, या जगांत वावरत असतांना सर्वांशीं बंधुभावानें व प्रेमानें वागणें व आपल्या आध्यात्मिक कल्याणासाठीं अहर्निश झटणें. आपल्यापुढें क्षुद्र भावनांना उभे रहातां येऊं नये. आपण नेहमीं उच्च व पवित्र वातावरणांत विहार करावा. साईबाबांच्या मतें धर्म कोणता ? पूजाअर्चा, ध्यान याच गोष्टी नव्हत. त्याहीपेक्षां महत्त्वाचें आणखी कांहीं तरी आहे. आम्हीं सदाचारी बनलें पाहिजे. दुष्ट भावनांना तिलांजली दिली पाहिजे.

आमच्या दैनंदिन वर्तनांत धर्म आढळून आला पाहिजे. कोणताही धर्म हलका किंवा दूषणावह नाहीं. प्रत्येकानें दुसऱ्याची किंवा दुसऱ्याच्या धर्माची निंदा न करतां स्वधर्मांत राहून व स्वतःचें वर्तन सुधारून आपलें कल्याण करून घेतलें पाहिजे.

आजच्या काळांत या शिकवणुकीचें महत्त्व अपरंपार आहे. प्रत्येकानें आपल्या परिस्थितीनुरूप वाट्यास जें कर्तव्य आलें असेल तें प्रामाणिकपणें पार पाडण्यासाठीं मनापासून झटावें. व आपलें जीवन वाट्यास आले असेल तो व्यवसाय उत्तमप्रकारें पार पाडून शोभविलें पाहिजे. आळस हा एक महारोग आहे! तो आत्मनाश करणारा आहे. त्याचा आपण त्याग केलाच पाहिजे. या जगांतच नव्हे तर परलोकांतही जर आपलें जीवन आनंदाचें व सुखासमाधानाचें जावें असें आपणास वाटत असेल तर आपण साऱ्या दुष्ट वासनांचा त्याग करून जीवनांत सर्वंकष पावित्र्य व मंगलता निर्माण केली पाहिजे.

श्रीसाईबाबा आपल्यांत वावरत होते त्यावेळीं आपल्या सत्कृत्यांनीं व सद्बोधामृतानें त्यांनीं आपल्या वरील प्रकारच्या शिकवणुकीचा प्रसार केला. ते देहानें आज आपल्यांत नसले तरी ते आपल्यांतून गेलेले नाहींत. आजही अदृश्य रूपानें आपल्या भक्तांस ते जरूर ती प्रेरणा देत आहेत व त्यांच्याकडून आपलें कार्य करवून घेत आहेत.

त्यांच्या शिकवणुकीचें आपण स्मरण करूंया आणि ती आचरणांत आणून आपलें कल्याण साधूं या. त्यांतच आपलें व आपल्या जन्मभूमीचें कल्याण आहे.

# श्रीसाई माहात्म्य

## ( एकांकिका—उत्तरार्ध )

लेखकः— बाळ ज. पंडित, एम् ए., एल्. एल्. बी.

तिसराः—खरचं बाबा, आमचं पामराचं चुकलं. आपली आम्ही थट्टाच केली. पण आपल्या खऱ्या शक्तीची कल्पना नव्हती आम्हाला. आतां आम्ही आपल्याला 'वेडाफकीर' म्हणणार नाहीं. आम्हाला माफ करा. पाय धरतों तुमचे.

साईबाबाः—बाबांनो उठा उठा....क्षमा कसली त्यात ? मी रागावलों नाहीं बरं तुमच्यावर !

तिघेः—नाहीं ? बाबा तुम्ही रागवलां नाहीं ? पण बाबा क्षमा केली आहे असं म्हणा !

साईः—बरं बरं. क्षमा केली आहे.—मग तर झालं ?

तिघे—श्रीमान् श्री साईबाबा महाराज की जय !

इतर—श्रीमान् श्री साईबाबा महाराज की जय !

सर्वगांवः—श्रीमान् श्री साईबाबा महाराज की जय !

\+ \+ \+

आतां लोकांना बाबांबद्दल आदरभाव वाटूं लागला. भक्तिभाव वाटूं लागला. लोक त्यांची थट्टा करीनासे झाले. त्यांना मदत करूं लागले. ते वाणीही त्यांना तेल देऊं लागले ! भक्तिभावाचे भुकेले लोकही जमूं लागले. आतां शिरडीला साईबाबांचें नांव सर्वतोमुखी झालें. बाबांची आता आरती होऊं लागली. द्वारकामाईत वाजत गाजत त्यांना लोक आणीत. त्यावेळच्या सूर्यप्रकाशांत बाबांची मूर्ति कांतिमान भासे. सारे त्यांचे दर्शन घेत. बाबांनी अनेकांना रोगातून मुक्त केलें. गांवावरची संकटं दूर केली. लोकांना सुखी केलं. त्यांना सन्मा-

र्गाकडे वळवलं. त्यामुळें कित्येकजण बाबांना परमेश्वराचा अवतार मानूं लागले. द्वारकामाईत आल्यावर बाबा शिळेवर बसत, अगर द्वारकामाईत फेऱ्या घालीत. मग गावांत भिक्षा मागायला जात, आणि नंतर लेंडिबागेंत जात. बाबांचा स्वभाव अतिशय विनयशील. ते म्हणत मी अल्लाचा सेवक आहे. आपण परमेश्वर आहोंत. असें ते मान्य करीत नसत. परमेश्वराचा मी सेवक आहे असेंच ते म्हणत. त्यांच्याकडे आलेल्यांशीं ते प्रेमाने वागत बोलत, उपदेश करीत. सर्वांना अडीअडचणींतून, संकटातून मुक्त करीत व त्यांना जीवनाचे आणि विश्वाचें तत्त्वज्ञान सांगून आनंदांत रहाण्याचा आशीर्वाद देत. त्यांनी अनेक चमत्कार करून दाखवले. महामारीची साथ शिरडी गांवांत येऊं दिली नाहीं. आपल्या पायांतून प्रत्यक्ष गंगायमुना झुळझुळ वाहवल्या. केवळ नमस्कारासाठीं त्यांनी चमत्कार करून दाखविले नाहीत, तर लोकांचे जीवन सुखी व्हावे, त्यांना आनंदाचा चिरंजीव ठेवा लाभावा, हाच त्यांचा त्यांत उद्देश होता. उदात्त हेतू होता.

" अगाध शक्ति अघटित लीला तव सद्गुरुराया।
जडजीवातें भवि ताराया तूं नौका सदया॥
वेणी माधव आपण होउनी प्रयागपद केलें।
गंगा यमुनाद्वय अंगुष्ठी प्रवाह दाखविले॥

(दासगणू)

एकदां पावसाळ्यांत फार मोठं वादळ झालं. शिरडीत झंझावाती वारे वाहूं लागले. आकाशांतून जणूं पाण्याचा धबधबा सांडतो आहे असंच वाटूं लागलं! वातावरणांतील सर्व दिशा अगदी भरून गेल्या होत्या. कांहीं म्हणून दिसत नव्हते. खालीं पाणी व वर पाणी. पाण्याच्या सरी व त्यांचा आवाज एवढेच दिसत होते, व तेवढेंच ऐकूं येत होतें! पण पाऊस लौकर थांबण्याचा बिलकूल रंग दिसत नव्हता. शिरडीचे लोक सहाजिकच घाबरले. आणि बाबांच्या आश्रयाला धावले.

" काय हा पाऊस, " " आणि हें वादळ पाहिलें का? " " किती मोठें?"
" देवा, वाचव रे बाबा यांतून "
दोघे:—" असले वादळ तर आम्ही पूर्वीं कधीं पाहिलें नव्हतें बुवा! "
" काय? सारं शिरडीगांव वाहून जाणार काय? "

पावसाची ही विलक्षण धूमधार थांबण्याचें चिन्ह दिसत नव्हतें. सारे लोक अनन्यभावे साईबाबांना शरण गेले तेवढ्यांत वर अस्मानाकडे नजर फेकीत आपल्या अधिकारी आवाजांत गर्जून बाबा म्हणाले, " पावसा थांब–थांब, तुझा हा नंगा नाच थांबव आणि शांत हो "

आणि काय आश्चर्य ! पहातां पहातां क्षणार्धांत पाऊस थांबला. दिशा दिसूं लागल्या. पक्षी आकाशांत स्वच्छंदानें फिरू लागले. सगळीकडे उजेड डला. शांत झालें सारें वातावरण. साईची कृपा म्हणूनच हा पाऊस थांबला होता.

नवलानें दिङ्मूढ झालेले लोक भानावर आले, आणि एका आवाजांत उद्गारले " साईबाबा, धन्य आहे आपली. आपल्या आशीर्वादाचेंच हें फळ. आमच्यावरचें संकट तुम्हींच निवारलेंत. "

बाबांनीं असे कितीतरी चमत्कार करून दाखवले. पंचमहाभूतांवर आपली हुकमत आहे, असेच त्यांनीं वरील उदाहरणांत दाखवून दिलें नव्हतें का ?

बाबांच्या पायांशीं कितीतरी लोक जमत. गांवांतले व गांवाबाहेरचे. गांवातले लोक आतां सर्वस्वी बाबांना मानत होते. बाहेरचे लोक त्यांचा आशिर्वाद मागण्यासाठींच येत, ह्यातही वाद नव्हता. मात्र कांहीं जण अज्ञानानें बाबाच्या जवळ जायला कचरत; मग इतर लोक समजूत घालीत व त्यांची मनोमन खात्री पटवून देत.

पहिलाः— आलोय खरा शिरडीला. पण बाबांना भेटावं कीं नाहीं, याचा विचार करतोंय. कांहीं बोलले म्हणजे.

दुसराः— असा कसा इच्यार करतुंस तूं गड्या. सोड त्यो ईच्यार.

पहिलाः— असं ?

दुसराः— बेशक. अर गाईवासरासारखं मुकं जनावर बी बाबांच्या पायाजवळ विसावा घेतात नी आनंदात पहुडतात. तथं तुला र काय झालं ? अर थंडीत काकडलेली सूर्याची कोंवळी किरणं बी आंत येऊन बाबांच्या धुनीजवळ तास तास ऊब घेत रांगत बसतात ! मग तूं का नाहीं जात. जा तिथं; जा अर बाबा म्हणे गाईप्रमाणेच दयाळ आहेत....मायाळू आहेत....

पहिलाः— जाऊं! खरच जाऊं ?

दुसराः— जा खुशाल जा. कल्याण करतील ते तुजं. अर, बाबा म्हणे देवमाणूस

आहे, देव माणूस. गर्व नाहीं, ताठा नाहीं, कायबी न्हाई.

तिसराः— भक्तिभावानं जगायचं आन भक्तिप्रेमान दुसऱ्याला जगवायचं, हेंच बाबांना ठाऊक आहे रे—बाबा म्हणजे कल्याण—प्रकृती आहेत बरं !

पहिलाः— मग जातोच मी तिथं; ठरलं !

दुसराः— अंग आक्शी. आर बाबांच्या साहुलींत गेलं कीं कुनाला बी ऊन लागत नाही. अर चंदनाची साऊली हाये ती. बाबा म्हणे खरोखरी एक माउली हाये माऊली.

अशारीतीनें लोकांना खात्री पटत जाई. त्यामुळें ते बाबांच्याजवळ जात. बाबा त्यांची ममतेने विचारपूस करीत. बाबा त्यांना प्रेमानेंच वागवीत, त्यांच्या अडचणी समजून घेत व त्यांना मार्ग सांगून सुखी करीत. आपला आशीर्वाद बाबा त्यांना मनापासून देत....

असाच कित्येकवेळां बाबांच्या सान्निध्यांत, त्यांच्या पायांपाशीं भाविक भक्तगणांचा सोहळा भरे. लोकांच्या प्रेमळ, आदरशील वागण्यामुळें बाबांन गहिंवरून येई. अशावेळीं लोकांनाही गद्‌गदून येई. आणि मांगल्यमय एकातांत बाबा कधींकधीं आपल्या मनचं हितगुज बोलत. त बोलत त्यांत त्यांचा जीव भरलेला असे. त्यांतून न कळत आशीर्वचनं, दिव्य संदेश, उत्कृष्ट बोल, सुभाषित व उपदेशामृताचे पाझर झरत. या शब्दसिंचनाच्या आनंदांत श्रोते अगदीं न्हाऊन निघत. मोहरून निघत अगदीं !

साईबाबाः— अर पोरांनो, तुम्ही काय पाहिलंय माझ्यांत............?

मला ना गांव ना नाव.... .... ....

मला कोणती जात नाय, ना पात नाय.... .... ...

का बाबांनों माझ्यासाठीं इतुका जीव शिणवतां ? का जीव पाखडतं माझ्यासाठीं ? एका परक्या अनोळखी माणसासाठी ?

अरं तुमचा बाप तसा मी........जा जा. तुमच्या आईबापावर प्रेम करा.... त्यांची सेवा केलीत तर तुमचें अठराविश्वे दारिद्र्य सुद्धां जाईल बरं ! अरं देव सुद्धा ताटकळत उभा राहील तुमच्यासाठीं—आई वडिलांची सेवा केलीत तर ! अरं जा, तुमचे आईबाप करतात तसें आपल्या पोराबाळावर बी प्रेम करा. पाखरावानी असतात बरं तीं ! बाहेरच्या कर्तव्यासाठी तीं एकदां दाहीदिशाला उडून

गेली की सारं सुनं सुनं होऊन जातं. जा बाळानो, लहान मुलाबाळांवर प्रेम करा. जगांत येऊन आपण स्वतः यशस्वी व्हा आणि त्यांना त्या साऱ्यांनाच यशस्वी करा.

आपलं घर, आपली माणसं–त्या सर्वांचा आनंद तोच आपला आनंद. गुण्यागोविंदानं नांदयचं आणि ईश्वराची भक्ती करायची, हेंच आपलं पुण्य. सद्वर्तन आणि सदाचार हाच आपला धर्म. स्वतःचं व दुसऱ्याचं जीवन सुखी करायचं हेंच आपलं सौंदर्य. अरं, देवाचं अन् जगाचं प्रेम आपल्यावर असल्यावर पाहिजेत कशाला त्या मानगडी, ती कारस्थानं, अन् उलटीं बोलणीं ? चांगल्या रीतीनं वागणं हाच आपला व्यवहार. जगाशीं प्रेमानं वागल्यावर जग तुमच्या-वंरही प्रेम करील बरं !

लोक हें सगळं ऐकून आनंदून जात. त्यांना जीवनाचं रहस्य समजल्याचं समाधान होई. बाबा आपल्याबरोबर अगदीं हृदयांतील भाषा बोलले म्हणून जे जे ऐकलें ते ते बोल आपापल्या हृदयांत सर्वजण जतन करून ठेवीत. द्वारकामाईतून बाहेर पडल्यावर त्यांच्यात संवाद चाले—

पहिला— अरं–बाबा म्हंजे माणूसकीचा गहिवर, दयेचा सागर, मायेचा पाझर, आनंदाचा झराच अगदीं, त्यांचे बोल म्हणजे नुस्ते दंवाचे थेंब नव्हेत बर. मोत्यांचे मणी हायेत ते मोत्याचे मणी.

( बाबांना हें ऐकू जाई व ते म्हणत )

साईबाबा— कां बोलतां बाबांनो असं ? अरं रस्त्यावर जन्मलेल्या पोरक्या अनाथ वासरासारखं माझं हे आयुष्य. कुठून आलों अन् कुठं जाणार ? मधल्या वेळच्या विश्रांतीसाठीं या मशिदींत, या चावडींत, या द्वारका-माईत या शिरडींत राहिलोय मी झालं ! कशाला बाबानो माझ्यामागं लागला तुम्ही ? मी गेल्यावर आठवण तरी राहिल कां रे बाळानो माझी ?

लोक म्हणः— बाबा, असं कां बोलतां ?

साईबाबाः— अरं कां म्हणतां काय ?

लोकः—जगाची तुम्ही आठवण ठेवलीत. जग तुमची आठवण ठेवणार नाही कां.

साईबाबाः— अरं हाये त्यो परमेश्वर, हाये तो अल्ला. तो माझी आठवण ठेवील. अन् तुमची बी ठेवील. तो तुम्हाला बरं करील. अन मला बी बरं करील. तो मोठीं चांगलीं कामं करतो बघा लोकांचीं. आजवर त्याच्यासाठी मी केलं. आतां करूं दे कीं त्याला एकदा तरी माझ्यासाठी—

लोकः—- साईमहारा—– तुम्हीं सोडून जाणार आम्हाला. ? मग आमच्याबरोबर कोण खेळणार ? कोण हंसणार ?

साईबाबाः—– अरे जा घरीं जा. पोराबाळांत खेळा. घरचे दिवे हाये तो त्ये. जळं द्या त्या दिव्यांना. अरं घरचं पोर हंसलं कीं आपलं भाग्यं हसलं बरं! अरं घरीं जा. त्या सगळ्यांत तुम्ही मला बघा. जा. त्यांना सुखांत ठेवा. माझा आशीर्वाद आहे त्या सगळ्यांवर. आन् मी तुम्हाला टाकून कुठं तरी जाईन होय ? अरं कुठं बी गेलों तरी तुमच्याजवळच राहीन मी. मग तर झालं ?

लोक म्हणतः—– साईबाबा मान्य आहे तें ! तुमचा पूर्ण आशीर्वाद असूं द्या आमच्या सगळ्यावर.

साईबाबाः—– आहे. बरं पूर्ण आशीर्वाद.

लोकः—– पर आम्हाला औषध कोण देणार ?

दुसराः—– अरं औषध कशाला. बाबांचा आशीर्वाद असल्यावर औषधाची काय जरूरी. ?

साईबाबाः—– अरं. हाय् ती की तुमचे आईबाप.... ....

लोकः—– बाबा. तुम्हीच आमचं दैवत.

साईबाबाः—– अरं आईबापांची सेवा करीत जा. जा आणि माझ्या ठिकाणीं लक्ष ठेवीत जा. म्हणजे मी ही तुमच्या ठिकाणी लक्ष ठेवीन. कल्याण होईल तुमचं बरं. जा बाबांनो जा. आनंदांत रहा. तुम्ही आनंदात असलां कीं मी आनंदांत राहीन बघा. जा मंडळींनो जा. ( लोक जात नाहींत तेव्हां ) अरं मी कुठला कोण ? काय ठाऊक नाहीं तुम्हाला ! कां जीव लावतां तुम्ही इतका ? तुम्ही माझ्यासाठीं इतकं करतां—– काय केलयं मीं तुमच्यासाठीं ? जन्माला आलं कीं जगायचं आणि दुसऱ्यावर प्रेम करायचं एवढंच तुम्ही करा; जा बाकी सगळें सोडून द्या माझ्यावर, आन् आनंद मानायला शिका.

लोक जातां जातां आपापसात बोलत, कुजबुजत जातात....

पहिला—– खरंच, बाबा म्हणजे देव हाये देव.

दुसरा—– अरं फुलांचा सुवास...

तिसरा—– आणि माणसांचे गुण....

चवथा— फूल सुकलं अन् मानूस म्हातारं झालं की आपसुकच निघून जातात. पर साईबाबांचं तसं न्हाई.

पहिला— बाबा, म्हणजे मांगल्यामय फुलं हायेत, मांगल्यामय फुलं ?

दुसरा— पण आपल्याला वास देण्यासाठीं न्हाईत ती देवाच्या डोक्यावर जाण्यासाठीं हायेत तीं.

तिसरा—निर्माल्यांत गेलं तरी सुवासानं निर्माल्यालांबी सुगंध, मांगल्य, टवटवीतपणा आन् तेजस्वीपणा देतील तीं.

चवथा—बाबांच्याजवळ मृगाची कस्तूरी, कमळाचा सुवास, तुळशीच्या मंजिरीचं मांगल्य, अन् कुबेराचं धन हाये.

पहिला— अरं एकादेवेळीं धन्वंतऱ्यावाणी, नुस्ता पाठीवरून हात फिरवला की खडखडीत बरं करतील बाबा.

दुसरा— बाबा म्हणजे पृथ्वीवरले अमृत हाये अमृत बरं !

तिसरा— त्यांचं नाव घेणं म्हणजेच संजीवनीविद्येचं पठण करण्यासारखं आहे.

चवथा— त्यांची आपल्यावर कृपा आहे एवढं समजलं तरी बास झालं !

सगळे— आतां चला........

( सगळे निघून जातात. पडदा पडतो. आतून आवाज येतो. जय साईबाबा महाराज की जय. )


## रोगों से दुःखी क्यों ?

क्या आप दुःखी हैं ? और क्या इसके कारण आपका रोग है ? यदि हाँ, तो आज ही अपने रोग का पूरा विवरण लिखकर एक फायल दवा मुफ्त लें। सफेद दाग, एक्जिमा या किसी भी रोग से पीड़ित हों तो हमारे इलाज से आपको भी अवश्य लाभ होगा। दवा जल्द मंगावें।

पता—हिन्द औषधालय

पो० कतरीसराय ( गया )

# श्री साईबाबांची शिकवण

( लेखक :— प्रभाकर एस्. जठार )

**'मना त्वांचि रे पूर्व संचीत केलें।**
**तयासारखें भोगणें प्राप्त झालें'॥**

मन, शरीर आणि आत्मा ह्यांचा फार जवळचा सबंध आहे. मनुष्यप्राणी हा ईश्वराचा अंश आहे, असें नुसतें न समजतां जरा पुढें आपण गेलों कीं आपणांस असें स्पष्ट दिसतें कीं मनुष्यप्राणी हा नुसता अंश नसून तो पूर्ण ब्रह्म, सतातन आणि चैतन्य आहे हें कळून येईल.

ह्या विश्वांत जें ईश्वरी तत्त्व भरून उरलें आहे त्याहून मनुष्यप्राणी हा निराळा नाहीं; निराळा असूंच शकत नाहीं.

साई–सत् चरित्रांत अध्याय १५ ओवी ॥ ७२ ॥
मजशीं धरूं नका अंतर । तुम्ही आम्ही निरंतर ॥
ऐसें मज जो जाणील नर । भाग्य थोर तयाचें ॥

ह्यांत सांगितल्याप्रमाणें व श्रीसाईबाबांच्या नित्य शिकवणीप्रमाणें "यादे–हक्क" मी तुझाच दास आहे, ह्या शिकवणीत श्रीभगवद्गीतेचें, वेदांचें व उपनिषदांचें पूर्ण सार आहे. मग तसें आपणांस कां पटत नाहीं ? पटत नसेल तर तें मनाचें अज्ञान आहे.

ईश्वर जर सर्वत्र आहे तर तो तुमच्या आमच्यांत नाहीं का ? अवश्य आहे. प्रत्येकांत त्याचें प्रमाण लहान मोठें, कमी, जास्त असें आहे का ? नाहीं. तें सर्वांत आणि सर्वांभूतीं सारखेच आहे व हें जाणण्यासाठींच हे सर्व मायेचे संसार–नाटक चालू आहे. एकदां ह्याचें ज्ञान झालें कीं ह्या नाटकाचा पडदा खालीं पडतो. भक्त मग ह्या विश्वनाटकाकडे तिऱ्हाईताप्रमाणें पाहूं लागतो.

॥ ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति ॥
॥ भ्रामयन् सर्वभूतानि यंत्रारूढानि मायया ॥
गीता १८।६१

॥ परि ज्ञानेंवीण नाशिले । जे बुद्धिभेदासी आले ।
॥ तेणेंचि त्या कल्पिलें । अनेकत्व ॥ ज्ञा अ. ४ ।ओ. ६८

माया ही ईश्वराचेंच रूप आहे म्हणून मनावर पहिल्यांदा मायेचा प्रभाव पडतो. मनुष्याचें मनच जर मेलें तर त्याला ह्या मायारूपी संसाराची काय गोडी वाटणार ? रोजच्या शब्दांत मन मरणें म्हणजे मनाला एक तऱ्हेचा वीट येणें पण "ज्ञान–योगांत" मन विटणें ह्यांचा अर्थ मनाला पूर्ण समजून घेणें मनाला पूर्ण समज येणें. आपणाला सुख, दुःख, ताप, संताप, क्लेश होतात. हे कोणाला होतात तर मनालाच होतात, शरीराला क्लेश झाले ह्याची जाणीव मनालाच पोहोंचते; मनाला सुख, दुःख झालें तरी तें मनालाच जाणवतें; आत्मा दुःखानें तडफडतो अगर सुखानें आनंदतो, हें खोटें आहे. तो फक्त Projection of Mind चा खेळ आहे. आत्मा तडफडत नाहीं अगर सुखावत पण नाहीं; पण मन मात्र तडफडतें अगर सुखावतें. आपण अज्ञानी माणसें चुकीचा वाक्यप्रयोग वापरतों कीं– "आत्मा तडफडला" "आत्मा शांत झाला" आत्मा- (राम) थड झाला. उदाः— "गाडी चुकली" गाडी चुकत नाहीं. गाडी पकडणारा उशीर करतो अगर चुकतो.

मनुष्याला प्राप्त झालेलें शरीर हें त्याचें स्वतःचें प्रारब्ध आहे. पुनर्जन्म ह्या विज्ञानाच्या युगांत सिद्ध झाला आहे. देहत्याग ( मरण ) म्हणजे, शरीराचा त्याग. देहावसान झालें म्हणजे आत्मा त्या देहांतून दुसरीकडे गेला आणि वासनेचें गाठोडें मात्र जातांना घेऊन जावयास विसरत नाहीं. वासनेला रूप, रंग, आकार, कांहीं नाहीं; वासना म्हणजेच "मन" आणि हें मनच स्थिर करावयास साधकांनीं शिकावयाचें असतें; "मन करा रे शांत। तें सर्व सिद्धीचें कारण" असें साधुसंत म्हणतात, तें त्याचसाठीं.

श्रीसाईबाबानीं कोणांस दीक्षा दिली नाहीं, कीं चेले केले नाहींत, कीं पंथ स्थापन केले नाहींत. त्यानीं फक्त "नामजप" सांगितला व साधकाला अत्यंत आवश्यक असलेली "श्रद्धा व सबुरी" ह्याचें माहात्म्य पटवून दिलें. श्रीसाईबाबा साक्षात ब्रह्मरूप असून ते "जगद्–गुरू" म्हणून शिरडींत प्रगट झाले. व आपलें कार्य करून पुन्हां अप्रगट रूपांत सध्या वावरतात. Static–Energy And Energy उदाः– अग्नी हा प्रत्येक लाकडांत "सुप्त अवस्थेंत" व "ज्वलन" करतांना "जागृत" अवस्थेंत प्रगट रूपात दृश्य असतो. जसें सोन्याचे अलंकार बांगड्या, मोहनमाळ, आंगठी ह्यातील मुख्य घटक "सोनें." आतां प्लास्टिकच्याही गिलीट केलेल्या सोन्याच्या बांगड्या मिळतात. पण सोनें

तें सोनें व पितळ ती पितळ विज्ञानानें असें पण सिद्ध केलें आहे कीं, सर्व धातूंत Matter मध्यें जी एक सुप्त शक्ति आहे ती सर्वांत एकच आहे. त्यामुळें विज्ञानाची क्रिया करून, लोखंडाचें काय पण दगडाचेंही सोनें करतां येतें. ह्यावरून ह्या सर्व विश्वांतील घटक हा एकच आहे आणि तो घटक कोणता हें जेव्हां कळेल तेव्हांच ईश्वर, ईश्वर हा कोण आहे हें विज्ञानाच्या शब्दांत समजून येईल. जसें पाणी म्हणजे विज्ञान हा ज्ञान योगच आहे.

मनाला ज्ञात होणें म्हणजे ज्ञान होणें. शरीर चिरंजीव होणें म्हणजे अमर होणें. आणि आत्म्याला ज्ञान होणें म्हणजे आत्मज्ञान होणें. ह्या गोष्टी श्रीसाई-बाबांनीं आपल्या भक्तांना अगदीं सोप्या भाषेंत सांगितल्या; पटवून दिल्या. त्यांच्याकडून करून घेतल्या; साधक भक्तांना धीर दिला आणि किती प्रेमानें आधीं गुळाचा खडा हातावर ठेवला आणि मग ज्ञानयोग शिकविला उताविळ, घाई नको " बनत बनत बन जायेगा " म्हणून सांगितलें. नाम्याचें मडकें कच्चें राहूं दिलें नाहीं. विचाराची "झलक" शिरडींत उठली व त्याचा सुगंध सर्वत्र पसरत पसरत चालला आहे.

हजारों वर्षांपूर्वीं हेच स्फुलिंग कुरुक्षेत्रांत प्रगट झाले होतें. तें पुन्हां शिरडींत प्रगटलें. " पुरुषार्थीं नसावें उदास " किती सोप्या शब्दांत महाभारत झाल्यानंतर जणू कांही " विश्वभारत " सांगावयाचें उरलें होतें. !

# निर्भयता

—संत विनोबा

पवनार येथें असतां लहान मुलांच्या मेळाव्यापुढें संत विनोबा हे महत्त्वाच्या विषयावर छोटीं छोटीं प्रवचनें देत असत. त्यांतील हें एक प्रवचन.

आज आषाढी एकादशी आहे. पंढरपूरला विठोबा कमरेवर हात ठेवून उभा आहे. लाखो लोक आज तेथे पोचले असतील. आपल्या इथें, या गावच्या लोकांनीहि, आश्रमांत येऊन, आश्रमाला प्रदक्षिणा घातली. आपल्याकडे असा रिवाज आहे, लोक आज पंढरपूरला जातात. विठोबाच्या देवळांत जातात आणि तेथे हरिनामाचा गजर करीत करीत प्रदक्षिणा करतात. तशी ही मंडळी येथे आली होती.

पण माझ्यापुढे प्रश्न येतो की ईश्वरविषयक एवढी श्रद्धा आहे, तर त्यामुळें निर्भयता आली का ? ज्यांची ईश्वरावर श्रद्धा असते, ते निर्भय असतात. तुकारामांनी सांगितलें आहे—' **हरीचिया भक्ता, नाहीं भय चिंता.** 'हरीदासाचें हें लक्षण आहे, कीं त्याला भय नाहीं आणि चिंता नाहीं. म्हणून असा अनुभव येतो का की ईश्वरावर श्रद्धा आहे तर मनुष्य निर्भय आहे. आपल्या ठिकाणीं भय आहे तर आपण ईश्वराचें श्रद्धेने नांव घेतो कां ?

ईश्वर–भक्ताला भय कसचें ? रक्षणाला परमेश्वर असल्यावर भय कशाला ? '**मातेचिया खांदी, बाळ नेणे भीण.**' आईवर श्रद्धा आहे म्हणून मुलगा आईच्या खांद्यावर निर्भयतेने झोपतो. तसेंच ईश्वरावर श्रद्धा आहे तर निर्भयता असायला हवी. निर्भयता हीच भक्ति आहे.

भक्तीने निर्भय होईल अशी अपेक्षा. तसें होत नाही. म्हणून ती भक्ति नाही. तें ढोंग नाही, पण ती भक्ति काल्पनिक आहे. ती जड श्रद्धा आहे, विवेकयुक्त भक्ति नाही. म्हणून आपण निर्भयतेचा अभ्यास केला पाहिजे. निर्भयतेच्या अभ्यासाने ईश्वरभक्ति येईल. म्हणजे उलटा प्रकार होईल. ईश्वर-भक्तीने निर्भयता, हा एक प्रयोग. आणि निर्भयतेने ईश्वर भक्ति हा दुसरा प्रयोग. हा दुसरा प्रयोग आपण करून पाहूं या.

ईश्वर निर्भय आहे. त्याचा आपल्याला काय उपयोग ? आपण ईश्वराचे गुण घेणार. ईश्वराच्या गुणांचा आपण अभ्यास करणार.

ईश्वराला निर्भय हे विशेषण शीख लोकांनी दिलें. "**निरभउ निरवैरु**" असें म्हटलें आहे. म्हणून सीख जमात जास्त निर्भय आहे, हें आपल्याला मान्य केलें पाहिजे. म्हणून हें नांव नाममालेत घातलें आहे. 'हे परमेश्वरा, तूं निर्भय आहेस, तर तुझ्या गुणांचा अभ्यास करून आम्ही निर्भय होणार ' असें म्हटलें आहे. आपसांत भांडणार नाही, प्रेमाने वागू. एकमेकांची सेवा करू, खरें बोलू. मग आम्हाला भय कसलें ? जो खरें बोलत नाहीं, ईश्वराची भक्ति करीत नाही, त्याला भय असतें.

# वर्धा येथील श्रीसाईबाबा
# सुवर्ण महोत्सव

## श्रीसाईबाबा ५० वा पुण्यतिथी महोत्सव, वर्धा.

वर्धा येथे श्रीसाईसेवा मंडळांतर्फे श्रीसद्गुरु साईबाबा यांचा ५० वा पुण्यतिथी महोत्सव सोहळा दि. ८ आक्टो. ते १५ आक्टो. पावेतो कॉटन मार्केटच्या पटांगणावर भव्य प्रमाणावर साजरा करण्यांत आला. ह्या महोत्सवांत श्रीपरमहंस संत पुंडलीक बाबा मु. गोरेगांवसंस्थान हे उपस्थित राहून त्यांनी हजारो लोकांना दर्शन दिलें. तसेंच श्रीसंत गुलाब बाबा काटोल ( कोलद ) संस्थान, वैराग्यमूर्ती कैकाडी महाराज मु. पंढरपूर, श्रीसंत सावजी महाराज, ह. भ प. शेलारमामा पुणें, ह. भ. प. श्री. डबीर साहेब चंद्रपूर, यांचें कीर्तन, श्रीमती प्रभावती राजे देवास, डॉ. चक्रधर, ॅ. देशमुख व सौ. इंदुताई देशमुख नागपूर, प्रा. वर्णेकर वर्धा, यांचें प्रवचन व प्रा. मनोहरराव कवीश्वर अमरावती. ह्यांचे गीतसाईनाथ, मेहरबाबा मंडळ नागपूर तर्फे मेहेरदीप्ति नाटिका व साईभक्त विजयबाबा नागपूर यांचा भजनाचा कार्यक्रम हजारो लोकांच्या उपस्थितींत उत्तम रीतीनें पार पडले. तसेंच महाप्रसाद (भंडारा) चाही कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर करण्यांत आला. भुसावळचे रांगोळी कलाकार श्री. मधुकरराव साली यांनी रांगोळी चित्रावलीद्वारा रांगोळींतून श्रीसाईबाबांचें विविध प्रकारें दर्शन घडविलें.

ह्या महोत्सवाचें अपूर्व वैशिष्ट्य आणि आकर्षण म्हणजे शिरडी प्रमाणेंच श्रीसाई समाधी मंदीर व द्वारकामाईचें दृश्य प्रत्यक्षांत उतरविण्यांत आलें होतें. त्यामुळें आपण प्रत्यक्ष शिरडींतच आहों असा क्षणभर भास आलेल्या दर्शनार्थी लोकांना झाल्यावाचून राहत नव्हता.

अखेरदिवशीं रात्रीं बँड, दारूकाम, भजनी मंडळ व दिंडीसह श्रींच्या फोटोच्या रथाची मिरवणूक मोठ्या जनसमुदायासह काढण्यांत आली. वर्ध्यांत हा कार्यक्रम खूप गाजला. हा कार्यक्रम यशस्वी रीतीनें पार पाडण्यास श्री जवाहरलाल राठी व मधुकर चामटकर ह्यांनी विशेष परिश्रम घेतले.

उत्सव पार पडल्यानंतरही साई सेवा मंडळानें प्रा. डॉ. नारायणराव राजदेरकर, औरंगाबाद, यांचा. दि. ३ नोव्हेंबर १९६८ला कीर्तनाचा कार्यक्रम चांगल्या रीतीनें आयोजित केला होता.

---

# व्यर्थ वणवण कशासाठीं ?

लेखकः— शाम जुवळे

गेले कांहीं महिने सर्वत्र चाललेली बाबांच्या ५० व्या पुण्यतिथीची तयारी पाहून साईनाथांचे दैवी–सामर्थ्य किती अतुलनीय व अलौकिक आहे हें स्पष्टपणें दिसून येतें. त्यांचा पार्थिव देह भक्तांच्या नजरेआड होऊन आज ५० वर्षें झालीं, तरी त्यांचें दैवी–सामर्थ्य व प्रेमळ–स्मृति एवढ्या कांहीं जबरदस्त रीतीने कार्य करीत आहेत कीं नास्तिकाला सुद्धां देवाचें अस्तित्व कबूल करणें भाग पडेल. खरोखर आपले बाबा म्हणजे सनातन–ब्रह्मच आहेत आणि म्हणूनच ते कालातीत आहेत. ते सर्वसाक्षी, सर्वभूतीं तसेच सर्वज्ञानी आहेत. हरघडीला ते भक्तांचें रक्षण तसेंच मार्गदर्शन करीत आहेत. ह्याची प्रचीति त्यांच्या इतर भक्तांप्रमाणें मलाही येत आहे. काव्यरूपाने कितीतरी गोष्टी ते मला शिकवीत असतात. नाहींतर माझ्यासारख्या पामराचें तें कार्यच नव्हे. त्यांच्या अमर्यादपणाचें वर्णन यथार्थपणें कोण व कसें करू शकणार ? पूर्णब्रह्माला अपूर्ण असें आपण मानव मर्यादाचें कुंपण कसें घालूं शकणार !

अलिकडेच त्यांच्या स्मृतिसान्निध्यांत बसण्याचें भाग्य प्राप्त झालें असतां त्यांनीं मार्गदर्शन करून स्फुरविलेलें काव्य मी येथें देत आहे.

### कांहीं सुवर्ण कण

कशास जावें वन शोधाया शांति–ब्रह्म मिळण्यास ।
हळूच शिरतां हृदयीं आपुल्या तिथें मिळे तें खास ॥ १ ॥
घागर असतां कटींच आपुल्या वळसा कां गावास ।
फुलांसाठीं कां वणवण फिरणें सोडुनि हृदय–फुलास ॥ २ ॥
सन्मित्राच्या भेटीसाठीं नको दूर जाण्यास ।
सखाराम तो वसतां अंतरिं समीप चोविस तास ॥ ३ ॥
वीट–चुन्याचें नकोच देउळ त्या आत्मारामास ।
हृदयाचें मंदीरचि वाटे हवेहवेंसें त्यास ॥ ४ ॥
शस्त्रास्त्रांचें अवडंबर तें हवें कशा अपणास ।
मनासारिखें बलवत्तर हें शस्त्र पुरे जपण्यास ॥ ५ ॥
मन हेंचि असे कारण अवघें बंधन वा मोक्षास ।
तेंचि करुनियां साधन अपुलें जावें परंधामास ॥६॥

॥ इति श्रीसाईनाथार्पणमस्तु ॥

आपला नम्र,

शाम जुवळे.

# सर्वत्र अध्यात्मदृष्टि असावी

लेखक : काकासाहेब कालेलकर

गीता म्हणते–ज्ञानी लोक सर्वत्र समबुद्धीने पहातात. **पंडिताः समदर्शिनः।** याचें कारणही गीतेनें तेथेंच दिलें आहे. ज्या ब्रह्माची ते ज्ञानी लोक उपासना करतात तें ब्रह्म स्वतः निर्दोष आणि सम असतें —**निर्दोषं हि समं ब्रह्म।** सत्पुरुष तेच कीं जे स्वतःचे सर्व दोष नाहींसे करून निर्दोष होण्याचा प्रयत्न करतात आणि सर्वांशी समबुद्धीनें वागतात. संतसत्पुरुष स्वतःला भेटायला आलेल्या लोकांमध्यें श्रीमंत आणि गरीब असा भेद करीत नाहींत. शहाणा आणि भोळा असाही भेद करीत नाहींत. लहान मुलांना ते किती प्रेमानें वागवतात. पश्चात्तापानें होरपळून गेलेल्या पापी लोकांना इतकी सहानुभूति दाखवतात कीं, त्यांना वाटावें आपली आईच आपल्याला भेटली आहे. आपल्या संतांनीं आणि भक्तांनीं ‘ गुरुमाऊलींचीं ’ स्तोत्रें गायिलीं आहेत, तीं केवळ औपचारिक नसून गुरुचरणीं कृतज्ञता अर्पण करण्यासाठीं आहेत. संतसत्पुरुष भेददृष्टीनें पाहूंच शकत नाहींत.

एक अगदीं घरचेंच उदाहरण द्यावेंसें वाटतें. न्यायमूर्ति अब्बास तैयबजी बडोद्यामध्यें न्यायाधीश होते. शेवटीं शेवटीं आणीबाणीच्या प्रसंगीं एका दिवसासाठींच कां होईना, ते काँग्रेसचे अध्यक्ष झाले होते. त्यांची मुलगी कुमारी रैहाना कृष्णभक्तीसाठीं गायनांत प्रवीण म्हणून आणि निष्ठेनें अध्यात्मसाधना करणारी साधिका म्हणून सर्वत्र विख्यात आहे. आज पुष्कळ वर्षें झालीं. माझे बरोबर माझी मुलगी म्हणून ती राहात आहे. तिला सर्व प्रेरणा इस्लामच्या एका महान् संताकडून मिळत असते. तिचें कुराणाचें अध्ययन दिवसेंदिवस वाढतच आहे. तिच्यांतील सर्वधर्मसमभाव इतका उत्कट आहे कीं तिच्या दृष्टीनें कोणताही धर्मसंस्थापक, ऋषि, मुनि, आचार्य, अवतारी पुरुष, प्रॉफेट, नबी, पैगंबर, मृत व्यक्ति नाहीं. ती म्हणते कीं, सर्वच दैवी पुरुष आज देखील समाजांत वावरत आहेत. जिज्ञासूंना ते मदत करीत असतात. सर्वच धर्म खरे आहेत. मुमुक्षूंचा

उद्धार करण्यास समर्थ आहेत, प्रत्येक धर्माचा धर्मबोध सरसपणें समजला मात्र पाहिजे. हीच गोष्ट सामान्य लोकांना समजविण्यासाठीं केव्हां केव्हां ती म्हणते, "हुजूर महंमद पैगंबर साहेब मला पित्याच्या ठिकाणीं आहेत. आणि बाकीचे सर्व धर्मगुरु माझे चुलते आहेत. मी त्यांच्यांत भेद कसा करावा? मी प्रत्यक्ष पाहातें कीं हे सगळे भाऊ भाऊ असल्यामुळें त्यांच्यांत उत्तम गट्टी आहे. अंध अभिमानी आपसांत धर्मभेदामुळें भांडतात, तेव्हां सगळे पैगंबर अत्यंत कष्टी आहेत."

आजकाल कु. रहैना यांना भेटायला अनेक प्रान्तांचे आणि अनेक देशांचे लहानमोठे लोक येतात. त्यांचेकडून व्यावहारिक गोष्टींत आणि आध्यात्मिक गोष्टींत त्यांचा सल्ला विचारतात. येणारा मनुष्य ज्या धर्माचा असेल त्या धर्माला अनुकूल असा सल्ला देण्याचा कु. रैहानाचा सिद्धान्त आहे. पुष्कळवेळा लोकांच्या घर-गुती अडचणी दूर करण्यांत देखील यांची मदत होते. बापाचें आणि मुलाचें कांहीं बिनसलें असलें, नवराबायकोंत कांहीं वितुष्ट आलें असलें, तर त्यांचेकडून परिस्थिति समजून घेऊन मग दोघांना समोर एकत्र बसवून चार उपदेशाच्या गोष्टी त्या सांगत असतात. ज्याची चूक असेल त्याची गोड खरडपट्टी काढ-ण्याचीही त्यांची तयारी असते. निःस्पृहतेनें आणि तटस्थपणें हे सर्व चालन असते. रैहानाजवळ लहान मोठा असा भेद नाहीं. एकदा एका थोर गोऱ्या विदेशी गृहस्थानें रैहानांना भेटण्यासाठीं अमुक वेळ मागितला. तोच वेळ त्यांनीं त्याच गृहस्थांच्या बबर्जीला (स्वयंपाक्याला) दिला होता. रैहानांनीं साफ सांगितलें कीं "ज्झाला जो वेळ दिला आहे तो त्याचा झाला; तुम्हाला दुसरा वेळ घेतला पाहिजे."

आपल्या देशांत सत्पुरुषांना लहान मोठा, श्रीमंत गरीब, स्त्री पुरुष, असा कसलाच भेदभाव नसतो. आपला समाज देखील संतसत्पुरुषाच्या बाबतींत कसलाच भेद ठेवीत नाहीं. हिंदु, मुसलमान, ख्रिस्ती, पारसी, यहुदी, सर्वच लोक उपदेश घेण्यासाठी संतांकडे धांव घेतात. संत मुसलमान असो किंवा हरिजन असो. मोठमोठे ब्राह्मण देखील त्यांच्या पाया पडतात आणि त्यांचें म्हणणें आदरानें ऐकून घेतात. संतांच्या बाबतींत त्यांचा धर्म, त्यांची जात, भाषा, प्रांत, कांहींच आड येत नाहीं. संत म्हणजे संत. तेथे धर्माचा किंवा जातीचा विचार काय कामाचा? असें लोक म्हणतात.

अशा सामान्य लोकांना मी विचारतों कीं हे संत लोक आपापसांत कसलाच जातिभेद किंवा धर्मभेद बाळगत नाहींत. तुम्हीही संतांच्या बाबतींत कसलाच भेद मनांत येऊं देत नाहीं. यामुळें तुमचें कसलेंही नुकसान झालें नाहीं. तर मग तुम्ही आपापसांत भेद काय म्हणून बाळगतां ? भिन्न जातीचे आणि भिन्न धर्माचे लोक आपापसांत मिसळले, त्यांनीं एकमेकांना मदत केली, एकमेकांचा सल्ला घेतला आणि खेळीमेळीनें राहिले तर तुमचें काय बिघडणार आहे ? समजा, आपण आपापल्या सणांप्रमाणें पारशांचे, यहुद्यांचे, जैनांचें, बौद्धांचे, ख्रिस्ती लोकांचे आणि मुसलमानांचे एक दोन सण पाळले तर काय बिघडतें ? आपण रामाची आणि कृष्णाची, विठोबाची आणि दत्ताची, कालीची आणि दुर्गेची पूजा करीत असतोंच. हनुमानाप्रमाणें आपण रामदासांची पूजा करतों. दोघांना एकच समजतों. मग बुद्धाप्रमाणें येशू ख्रिस्ताची देखील पूजा केली तर काय बिघडेल ? नाताळच्या दिवशीं आपण येशूच्या चित्राला किंवा पुतळ्याला माळा घातली, त्याचा उपदेश वाचला किंवा ऐकला, आपण त्याची आरती केली आणि आपल्या ख्रिस्ती बांधवांना उत्सवासाठीं बोलवलें, तर कोणाचें काय गेलें ? ईदच्या दिवशीं आपण आपल्या मुसलमान स्नेह्यांचें अभिनंदन करीत आलोंच आहोंत. या देशांतील माझ्या बांधवांनीं ज्या धर्माचा स्वीकार केला, तो धर्म आतां मला परका नाहीं. हिंदुस्थानांतील लोक जे जे धर्म पाळतात, ते ते सगळे धर्म स्वदेशी, ही गोष्ट आपण ध्यानांत कां घेऊं नये ?

कित्येक लोक या प्रकारची सूचना ऐकून मनांतून चिडतात आणि म्हणतातः— “ आम्ही उदारता दाखवायला तयार आहोंत; परंतु ते लोक आपला हेका, आपला संकुचितपणा आणि मगरुरकी सोडायला तयार आहेत काय ?” यावर मी इतकेंच म्हणतों कीं, आपण तसा प्रयत्न करून पाहिला आहे काय ? ते लोक वागतील तसेंच आपण वागणार असें म्हणण्यांत, आपण त्यांचे शिष्य बनत आहोंत. याचें ज्ञान पुष्कळांना नसतें. आपण हिंदुधर्म, संस्कृति आणि समाज यांचा विचार करतों तेव्हां आपला पराभव करून आपल्यावर राज्य करणारे सगळेच परधर्मी लोक आजही आपले विरोधक आणि शत्रू आहेत, असें मानून चालतों. पण अशा ढोबळ विचारानें आपण आंधळेपणानें आपलें नुकसान करून घेत आहोंत, हें समजत नसेल तर कोणाशीं कसें वागावें हें कळणार नाहीं. आंधळेपणानें विचार करणाऱ्या लोकांस हें समजत नाहीं

हिंदु समाजाचें भविष्य सुरक्षित नाहीं. हें कठोर सत्य हिंदु समजाला वेळींच समजलें पाहिजे. आपले लोक आंधळेपणानें इतर सगळ्या सांस्कृतिक गोष्टी सोडून राजकारणाचा विचार करूं लागले आहेत. त्यामुळें त्यांचें राजकारणही आंधळें बनलें आहे. सध्यां तर व्यापिक राजकारणी दृष्टी लुप्त होऊन, लोकांची मतें मिळवून अधिकार हस्तगत कसा करावा, एवढीच दृष्टी प्रखर झाली आहे. हातीं अधिकार आल्यानंतर, प्रजेचें हित असें करावें, जनतेचें सामर्थ्य कसें वाढवावें, याचा विचार फारच थोड्यांना सुचतो. आंधळ्या राजकारणापुढें डोळस अध्यात्म सुद्धां लोकांना पटेनासे झालें आहे.

येथे राजकारणाची चर्चा करावयाची नव्हती. सर्वांत श्रेष्ठ 'कारण' माझ्यामतें जीवनकारण आहे. धर्म किंवा अध्यातम यांची विशाल कल्याणकारी तत्त्वें देखील जीवनकारणासाठींच आपल्याला हवी आहेत.

तेव्हां धर्मकारण पाहूं. धर्माचा प्राण म्हणजे अध्यात्म. त्यानें केवळ तर्काचा अथवा दार्शनिक पद्धतिचा आश्रय न करतां जीवनदृष्टीच्या मदतीनें अध्यात्माचा विकास केला पाहिजे.

सर्वच धर्मात उच्च कोटीचें अध्यात्म असतें. पण त्या त्या लोकांचे कित्येक दुराग्रहही त्याबरोबर असतात. दृढमूल अशा भ्रामक कल्पना देखील असतात. इतिहास परंपरेनें मजबूत झालेल्या आवडीनावडी असतात. त्यांना आपण भोळसटपणें स्वधर्म म्हणून टिकवू पहातों. ब्रह्मदेशांतील लोक विशिष्ट प्रयारचें एक स्वादिष्ट पदार्थ तयार करतात. तो त्यांना फारच आवडतो. ब्रह्मी लोकांचा तो राष्ट्रीय आहार होय. डॉक्टर लोकांचें म्हणणें असें आहे कीं त्याची गोडी कृत्रीम रीतीनें वाढविली आहे, तो पदार्थ आरोग्याला बाधक आहे. नेहमीं खाणाऱ्याना त्यामुळें विशिष्ट रोग होतात.तरीही ब्रह्मी लोक हा आपला राष्ट्रीय आहार आहे असें म्हणून त्याचें समर्थन करतात. आणि कांहीं केल्या तें खाणें सोडत नाहींत. अशा कित्येक चालीरीती, कित्येक समज, अशा रीतीनें आपण उराशीं बाळगून आहोंत कीं नाहीं ?

कित्येक गोष्टी जुन्या काळीं, त्या परिस्थितींत योग्य असतील किंवा त्यांतील अनिष्टता लक्षांत आली नसेल. पण आतां त्या कालग्रस्त आहेत म्हणून दुलक्ष करावें. समाजाला ऐतिहासिक परिवर्तनें समजत नसलीं, म्हणजे टाकाऊ गोष्टी देखील तो सोडत नाहीं.

एकदां लाला लजपतराय मुंबईच्या हिंदूंना म्हणाले होते :—"मुसलमानांच्या चढेलपणानें तुम्ही चिडून गेला आहांत हें मला समजतें. हा अनुभव तुमच्यापेक्षा आम्हां पंजाबीयांना अधिक आहे. पण त्यामुळें तुम्ही हिंदुसंगठन काय म्हणून करावें ? मुसलमानेतर सर्व भारतीयांचें संगठन तुम्हीं कां करूं नये ? तुम्ही हिंदुसंगठन करून ख्रिस्ती, यहूदी, पारसी या सर्वांना बाहेर ठेवतां आणि त्यांना मुसलमानांकडे ढकलतां. तुम्ही आपलें संकुचित संगठन करून इतर लोकांना आपले शत्रू किंवा विरोधी बनवतां, याला काय म्हणावें ? " मीही त्यावेळीं म्हणालों होतों कीं आपण हिंदू म्हणून मुसलमानांशीं बोलणीं करण्यासाठीं गेलों तर ते सर्व जुन्या गोष्टी आठवून म्हणतील कीं आम्हाला काय देतां बोला ? आणि मग ते आपली शेंडी पकडतील. त्यापेक्षां आपण सर्व गैर मुसलमान एक होऊन त्यांच्याशीं बोलूं लागलों तर आपली भूमिका राष्ट्रीय राहील. हा लाभ आपण कां सोडावा ?

कोणीच आपल्या बाजूचे राहाणार नाहींत अशी भीति तुम्हांस वाटली तर आपणाकडे मोठा दोष येतो. आपली वृत्ति संकुचित ठरते.

सर्व गैर हिंदूंना बाहेर ठेवणारें तत्त्वज्ञान खऱ्या अर्थानें धार्मिक होत नाहीं. विश्व ऐक्याच्या गोष्टी करणारांना तर तें मुळींच शोभत नाहीं. सर्व मानवता एक कुटुंब आहे, या आजकालच्या युगभावनेला तें हरताळ फासतें. मुख्य म्हणजे हिंदु संस्कृतीचें तें लक्षणच नव्हे. आपण आपल्या व्यापक जीवनदृष्टीनें आणि त्याच्या राहणीनें दाखवून दिलें पाहिजे कीं, आपल्यांत परकेपणा नाहीं. ज्यांच्यांत तो असेल त्यांनीं तो काढून टाकला पाहिजे. अथवा स्वतःच्या संकुचित दृष्टीसाठीं त्यांनीं सहन केलें पाहिजे. जे कोणी आम्हांला काय देतां बोला असें विचारतात, त्यांना आपण सांगितलें पाहिजे कीं "आम्ही कांहीं देणार नाहीं. आम्ही आपुलकीनें वागूं, मग तुम्हालाही तसेंच वागावें लागेल. "

अमेरिकेंत अशीच भूमिका आहे. त्यांनी सर्वांना सारखा न्याय मिळावा म्हणून एक ' फेअर प्रॅक्टीस बोर्ड ' नेमलें आहे. आणि जाहीर केलें आहे कीं तुमच्या पूर्वजांनीं आमच्या पूर्वजांना वाईट रीतीनें वागवलें म्हणून आज तुम्ही आम्हांला विशेष अधिकार दिले पाहिजेत असें कोणीं म्हटलें तर त्या म्हणण्याकडे कोणीं लक्ष देणार नाहीं. आमचें वागणें पक्षपाती नाहीं, याची खात्री आम्ही देऊं शकतों.

अस्पृश्यता आपण दूर केली नाहीं. तें आपलें कर्तव्य आपण इतरांना पटविलें नाहीं, मग आम्ही सर्व समान आहोंत, असें कोणत्या तोंडानें म्हणावें ! डॉ. झाकीर हुसेनना आपण अध्यक्ष केलें हें उत्तम झालें. पण तें सर्वांनुमतें ना-विरोध झालें असतें तर सोन्याहून पिवळें आणि सुगंधित झालें असतें.

राजकारणाची चर्चा खरोखर मला करावयाची नाहीं. तरी आजच्या राजकारणामुळें जीवनकारणांत कशा अडचणी उत्पन्न होतात, हें दाखवून द्यावेंसें वाटतें. आपण उत्तर भारत व दक्षिण भारत असा भेद करतों, तेव्हां आपली संकुचित वृत्ति स्पष्ट होते. आपली दुर्बलता व्यक्त होते. सर्वांची दृष्टि विकृत बनते.

याला उपाय राजनैतिक नसून सामाजिक आणि सांस्कृतिक आहे. आपल्या धार्मिक भावना आपण बदलल्या, रोजच्या व्यवहारांत भेदभाव आणि परकेपणा काढून टाकला तरच आपल्याला 'ऐक्यमूलक' समानता चालवतां येईल. सामाजिक वेगळेपणा कायम ठेवला तर 'आमच्याविरुद्ध पक्षपात होतो' अशी हाकाटी करणाऱ्या स्वार्थी लोकांना वाव मिळतो. आपलेच दोष आपल्याला नडतात ते असे.

दुसरी गोष्ट जरा विचित्र वाटेल, पण ती खरी आहे म्हणून नमूद करतों. आपल्याला विविधतेंत एकता स्थापित करावयाची आहे. विविधता दाबून टाकली तर तिचाच अभिमान धरून संकुचित लोक नेते बनतात. यासाठीं आपण लहान लहान आटपशीर संगठनें स्वीकारलीं पाहिजेत. जेथें बंगाली लोक राहतात तेथील राज्यकारभार आणि सरकारी काम बंगाली भाषेंत चाललें पाहिजे, असें म्हणणें निराळें आणि सर्व बंगाली बोलणारे लोक एका प्रांतांत एका राज्यांत आले पाहिजेत, असें म्हणणें निराळें. बंगाली बोलणाऱ्या लोकांचीं लहान लहान तीन राज्यें झालीं तर काय बिघडलें ? भारताचें एकत्व अबाधित रहातें, एवढेंच सर्वांनीं पहावें. मराठी बोलणाऱ्यांचीं तीन राज्यें झालीं म्हणून काय बिघडलें ? हिन्दी ज्यांची जन्मभाषा किंवा स्वभाषा आहे, त्या सगळ्यांचें एक राज्य गैरसोयीचें असूनही आपल्याला तें क्रमप्राप्त म्हणून मानावें लागेल.

जनतेचें राज्य किंवा प्रजाराज्य चालवायचें असेल तर, लहान लहान भागांत पुष्कळ लोकांना सेवेच्या द्वारा नेतृत्व करण्याची संधी दिली पाहिजे.

मोठीं मोठीं कामें करण्यासाठीं लहानांनीं तेवढ्यापुरतें मोठें स्वेच्छा संगठन करावें. हीच नीति आपल्या राष्ट्राला म्हणजे आपल्या राष्ट्रीय स्वभावाला हितकर आहे.

प्रथमपासून मी म्हणत आलों कीं, आपण लहान लहान संगठनें करून, सर्वांना संतोष देऊन, ज्यांच्या हृदयांत, जीवनांत आणि रोजच्या वागण्यांत, विशाल एकता मुरलेली आहे, अशा लोकांनीं प्रथमपासून लहान संगठनें मान्य केलीं असतीं तर संकुचित लोकांना भांडून तंडून लहान संगठनें मिळवावीं लागलीं नसतीं. नेतृत्व व्यापक दृष्टीच्या लोकांच्या हातीं राहिलें असतें आणि मग त्या त्या प्रदेशांच्या लोकांच्या संमतीनें आपण लहान संगठनें तोडून, मोठीं संगठनें केलीं असतीं, तर ही व्यापक भूमिका समाजमान्य झाली असती.

गुजराथमध्यें सौराष्ट्राचें प्रथम निराळें राज्य होतें, पुढें लोकांनीं स्वेच्छेनें सगळा गुजराथ एक केला. पुढें सौराष्ट्राच्या कांही नेत्यांनीं अलग राज्याची मागणी केली. मी त्यांना म्हणालों कीं मला तीन बंगाल, दोन उत्तरप्रदेश, दोन पंजाब, तीन महाराष्ट्र आणि तीन गुजरात मान्य होते. त्या वेळीं सौराष्ट्राचें राज्य निराळें होतें. तुमचेवर केंद्रीय सरकारनें किंवा सबंध राष्ट्रानें एक होण्याची गोष्ट लादली नव्हती. तुम्ही स्वेच्छेनें, हौसेनें एक झालां. आतां अलग होण्याच्या तुमच्या मागणीला जोर येणार नाहीं.

या सर्व गोष्टी मी राजनीतीच्या किंवा अधिकार विभागणीच्या दृष्टीनें बोलत नसतों. कोणचें आणि किती अध्यात्म लोकांना पटलें आहे, किंवा पटविणें शक्य आहे, याचा विचार करूनच मी बोलत असतों. महाराष्ट्र एकीकरणाची चर्चा चालू होती, तेव्हां कित्येक नेत्यांशीं बोलतांना मी म्हणालों होतों कीं समजा कोंकण, देश आणि महाविदर्भ अशीं मराठी बोलणाऱ्यांचीं तीन राज्यें भारत सरकारनें म्हणजेच राष्ट्रानें केलीं आणि सांगितलें कीं हीं तीन राज्यें नांदूं लागल्यानंतर तिसऱ्याच दिवशीं तुम्हाला एक होण्याची मोकळीक आहे, तर त्यांत काय बिघडलें ? डॉ. आंबेडकर मला म्हणाले, तुमची सूचना शुद्ध आणि इतिहासशुद्ध आहे. दुसरे एक नेते मला म्हणाले, तुम्ही सुद्धां महाराष्ट्रीय आहांत. तुम्हाला घरच्या सर्व अडचणी ठाऊक आहेत. म्हणूनच तुम्ही आम्हांला असा पेंच घालूं पाहतां. तुमची गोष्ट आम्ही कशी मान्य करावी ?

मी म्हणालों, तुमच्या बोलण्याचा अर्थ असा होतो कीं ‘ मराठी बोलणाऱ्यांचें हार्दिक ऐक्य नाहीं. ’ पण मला तसें वाटत नाहीं. भारतीय ऐक्याचा पुरस्कार करणाऱ्या विशालहृदयी लोकांनीं मराठी बोलणाऱ्यांचीं तीन राज्यें

केलीं असतीं तर त्यांचेंच नेतृत्व कायम टिकलें असतें. आणि सेवा करतां करतां लोकांचा विश्वास संपादन करून नंतर त्यानीं जरूर तर मराठी बोलणाऱ्यांचें एक राज्य सहज केलें असतें. किंवा त्यांनीं तीन राज्यांचें सहयोगी संगठनही केलें असतें. एकता लोकांवर लादायची नसून ती आंतून अनुभवायची असते. त्यासाठीं महत्त्वाकांक्षी लोकांना पुढें करून चालणार नाहीं. सेवापरायण विशालहृदयी लोकांचें नेतृत्व चालू ठेवलें पाहिजे. आज दर पांच वर्षांनीं आपण निवडणूक करतों. ती म्हणजे अधिकारलोलुप लोकांचा नियमबद्ध जुगारच नव्हे काय ? जुगारी लोकांनीं भाषेचें नांव पुढें केलें काय, धर्माचें नांव पुढें केलें काय, आणि जातीचें नांव पुढें केलें काय, अर्थ एकच. मतदानांत राष्ट्रहिताचा विचार झाला पाहिजे. अधिकार हस्तगत करण्याची चढाओढ म्हणजेच जुगार होय. जुगार हें कांहीं सांस्कृतिक किंवा आध्यात्मिक तत्त्व नाहीं. संत सत्पुरुष अधिकाराचे खेळ खेळत नाहींत. व्यवहारांत उच्च तत्त्वांची हेटाळणी होते आणि जुगाराला व्यवहार म्हणतात. व्यवहारानें नेहमीं खऱ्या व्यवहाराचें वाटोळें केलें आहे. ‘ व्यवहारी लोक ’ म्हणतात :– आम्ही शहाणे आहोंत. पण लोकहिताचा खरा व्यवहार तेच बुडवतात. आणि पुन्हां निर्लज्जपणें म्हणतात :–“गिरा तो भी क्या हुआ, मियां की टांग तो उपर ही है.”

लोकांना उच्च भूमिकेवरून विचार करायला शिकविलें पाहिजे. धर्माचा अभिमान बाजूला ठेऊन संतसत्पुरुषांनीं लावून दिलेला अध्यात्ममार्ग आपण चोखाळला पाहिजे. उच्चनीच भेद दूर करून सगळ्या जाती एक केल्या पाहिजेत. आणि सर्वांनी एकमेकांत मिसळून राष्ट्रीय एकता आणि मानवता नित्य व्यवहारांत अनुभवली पाहिजे. हें काम राजकारणी लोकांच्या हातून होणार नाहीं. यासाठीं आपण संतांच्या मार्गानें जाऊन एकतेचा अनुभव घेतला पाहिजे. दोष दूर करा आणि समता अमलांत आणा, हाच एक उपदेश उद्धारक आहे. हाच तारक मंत्र आहे.

# सर्वधर्मांचें सौंदर्य

**—म. गांधीजींची अमर वाणी**

सर्व धर्माचा आत्मा एकच असतो परंतु विविध रूपांत तो व्यक्त होतो. ही रुपभिन्नता कालाच्या अंतापर्यंत चालू राहील. सूज्ञ माणसे बाह्यरूपाकडे दुर्लक्ष करतील व त्या मागच्या एकाच आत्म्याचें स्वरूप पाहू शकतील.

मग प्रश्न असा येतो कीं, हे एवढे धर्म हवेत तरी कशाला? आत्मा एकच आहे. हीं शरीरे जो सजीव करतो ती मात्र अनेक आहेत. ही शरीरांची संख्या आपल्याला कमी करता येणार नाही; परंतु आत्म्याचे ऐक्य आपण जाणतो. झाडाला सुद्धा एकच खोड असते; परंतु अनेक फांद्या व पाने असतात, त्याच-प्रमाणे खरा व पूर्ण धर्म एकच आहे. मानवी माध्यमातून तो व्यक्त झाला की अनेक धर्म दिसू लागतात.

जगातील सर्व महान धर्मामागील मूलभूत सत्त्यावर माझा विश्वास आहे. ते ईश्वरदत्त आहेत. असे मी मानतो. ज्या लोकांसाठीं धर्म व्यक्त करण्यांत आले त्यासाठीं ते आवश्यकच होते असेहि मी मानतो. त्या त्या धर्मानुयायांच्या श्रद्धेतून त्यांच्या धर्मग्रंथाचे वाचन आपण करू शकलो तर मुळात सर्व धर्म एकच व परस्परांना सहाय्यक आहेत हें आपल्याला उमजेल असें मला वाटतें.

सत्यदर्शन हा सर्व धर्मपंथांचा गाभा आहे. परंतु सर्व धर्म अपूर्ण अस-तात. चुका करू शकतात. दुसऱ्या पंथाच्या आदर भावनेमुळे त्यातील दोषांकडे दुर्लक्ष करण्याचे कारण नाही. आपल्या स्वतःच्या धर्मातील दोषांचीहि स्पष्ट जाणीव आपल्याला हवी. तेवढ्यासाठीं धर्म सोडण्याचे कारण नाही, तर हे दोष दुरूस्त करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. सर्वच धर्माकडे सम दृष्टीने पाहिले कीं, दुसऱ्या धर्मातील प्रत्येक मान्य तत्त्व आपल्या धर्मात समाविष्ट करण्यास आपण केवळ अवमान करणार नाही, एवढेच नव्हे तर ते आपण आपले कर्तव्यच मानू.

## उत्तम तत्त्वे आत्मसात करणे हे एक कर्तव्यच

तरुणपणानंतर, जगातील सर्व धर्मातील सत्य समजून घेण्याचा अविरत प्रयत्न मी माझ्या मतीने केला आहे आणि त्या धर्मात जे जे सर्वोत्तम आढळले ते ते माझ्या विचारात, शब्दात व आचारात आणण्याचा व बाणविण्याचा प्रयत्न

मी केला आहे. मी जी श्रद्धा बाळगतो त्यामुळे ही अशी सुभा मला मिळाली. एवढेच नाही तर कोणत्याहि मार्गाने व्यक्त झालेले जे उत्तम असेल ते आत्मसात करणे हे माझे कर्तव्यच बनले.

पृथ्वीच्या पाठीवर सर्वत्र व्यवहारात केवळ एकच धर्म कधीकाळी नांदेल असें मला वाटत नाही. तत्त्वतः, ईश्वर एकच असल्यामुळे केवळ एकच धर्म राहू शकेल. परंतु प्रत्यक्षात, ईश्वराबद्दल एकच किंवा एक सारखी कल्पना असलेल्या दोन व्यक्ती काही मला आढळलेल्या नाहीत. म्हणूनच निरनिराळ्या स्वभावानुरूप किंवा देशकाल परिस्थितीनुरूप वेगवेगळे धर्म बहुधा कायमच राहतील. जगात एकच धर्म असला तर तो शब्दाच्या अतीत राहील. अपूर्ण माणसे आपल्याला येईल त्या भाषेत व आपले मर्यादित शब्दप्रभुत्व उपयोगांत आणून हा धर्म व्यक्त करतात व दुसरी तेवढीच अपूर्ण माणसे स्वतःच्या कुवतीनुसार त्यांचा अर्थ लावतात. मग अर्थ तरी कुणाचा खरा धरायचा? स्वतःच्या भूमिकेतून प्रत्येक जणच बरोबर ठरेल. परंतु प्रत्येक जणच चुकीचा असणेहि शक्य आहे. म्हणूनच सहिष्णुता हवी. अशी सहिष्णुता म्हणजे स्वतःच्या श्रद्धेबद्दल उदासीनता नव्हे तर तिच्याबद्दल अधिक विशुद्ध व सूज्ञ प्रेम होय. लोक आपल्या धर्माइतकाच इतर धर्माबद्दलहि आदर बाळगतील अशी वेळ येणार आहे, हे मला स्पष्ट दिसू शकते. विविधतेतून ऐक्याचा शोध आपण घेतला पाहिजे असे मला वाटते. एकाच ईश्वराची आपण लेकरे आहोत म्हणून संपूर्णतया बरोबरीचेच आहोत. एकाच दर्जाचे आहोत. धर्म कांही मानवा मानवांत फूट पाडण्यासाठीं नाहीत तर त्यांना एकत्र आणण्यासाठीं आहेत.

## हिंदुत्वाची माझी व्याख्या

मी एक सनातनी हिंदु आहे असे मी म्हणतो व अशा प्रकारच्या माणसात जे विशेषत्वाने आढळते ते माझ्यात दिसले नाही की माझे मित्र घोटाळ्यात पडतात हे मला माहिती आहे. कारण कट्टा हिंदु असूनहि ख्रिश्चन, इस्लामी व पारशी शिकवणीला माझ्या श्रद्धेत स्थान आहे आणि त्यामुळें माझा हिंदुत्ववाद अनेकांना सर्वांचे मिश्रण वाटतो तर कांही मला सर्वग्राहक म्हणतात. मला सर्वग्राहक म्हणणे म्हणजे माझ्या मनात श्रद्धा नाही असे म्हणणे होईल; परंतु माझी श्रद्धा इतकी व्यापक आहे कीं, ख्रिश्चन मग तो कट्टर पंथाचा का असेना किंवा धर्मांध मुसलमान का असेना, त्याला मी विरोध करू शकत नाहीं. सर्वांत

व्यापक अशा सहिष्णुतेवर माझी श्रद्धा आधारलेली आहे. कोणाच्याहि धर्मवेड्या कृत्यांना मी दोष देणार नाही; कारण त्याच्या दृष्टिकोनातून मी त्यांच्याकडे पाहण्याचा प्रयत्न करतो. ही व्यापक श्रद्धा हीच माझा आधार आहे. ही स्थिती कांहींशी अडचणीची वा गोंधळाची आहे हें मला माहीत आहे, पण ती इतरांना, मला नाहीं !

## अनेकत्वांतील एकता

जगातील विविध धर्माच्या गुणावगुणांचे मूल्यमापन करणें अशक्य आहे, इतकेच नव्हे तर तसा प्रयत्न करणें हे अनावश्यक व घातकही आहे असें मला वाटतें. परंतु माझ्या मताने त्या प्रत्येकात एक समान प्रेरक शक्ती आहे आणि ती म्हणजे मानवी जीवन उच्च पातळीवर नेऊन त्याला कांहीं अर्थ व ध्येय निर्माण करून देण्याची इच्छा ही होय ! येशू ख्रिस्ताच्या जीवनाचे हे असे सार असल्या मुळे तो केवळ ख्रिश्चनांचाच नाही तर संपूर्ण जगाचा आहे असे मला वाटते. मानव कोणत्याहि झेंड्याखाली, नावाखाली किंवा तत्त्वज्ञानाखाली आपल्या श्रद्धेचे पालन करीत असो किंवा आपल्या पूर्वजांकडून चालत आलेल्या ईश्वराचे पूजन करीत असो– तो कोणत्याही जातीचा वा वर्णाचा का असेना; येशू हा त्याचाहि आहे ही माझी श्रद्धा आहे.

भारतात खूप अज्ञान व अंधश्रद्धा आहे. परंतु आमच्या मनात खोलवर ईश्वरावर निष्ठा आहे. धर्म बुद्धी आहे.

प्राचीन संस्कृतीचे गुप्तधन शोधून काढण्याचा प्रयत्न करीत असतांना माझ्या हाती एक अनमोल ठेवा लागला आहे आणि तो म्हणजे प्राचीन हिंदु संस्कृतीत जी सनातन तत्वें आहेत ती येशू, बुद्ध, महमद, झरतुष्ट यांच्या शिकवणुकींतहि आढळतात.

सर्व जगाच्या समाजाकडे नजर टाकली तर द्वैत किंवा अनेकत्वाखेरीज कांहीं दिसतच नाही. एकता अभावानेच तळपते. हा माणूस मोठा आहे, तो माणूस नीच आहे, हा हिंदू तो मुसलमान, तिसरा ख्रिस्ती, चौथा पारशी तर कोणी शिख तर कोणी ज्यू ! परत त्यांच्या त्यांच्यांत पोटभेद. माझ्या कल्पनेतील एकतेत, या अनेकत्वांत एक अविच्छिन्नी ऐक्य आहे.

# शिरडी-वृत्त

## ऑक्टोबर १९६८

या महिन्यांत शिर्डीस वाहेरगांवची भक्त मंडळी फारच मोठ्या प्रमाणांत आली. याचें एकच कारण. ज्याना पुण्यतिथी उत्सवास येतां आलें नाहीं अशी वरीच मंडळी या महिन्यांत आली होती. कांहीं कलाकारांनी श्रीपुढें हजेरी दिली ती.

### कीर्तनें

श्री. ह. भ. प. सदाशिव केशव दसनूरकर मनमाड. तसेंच संस्थानगवई यांचीं कीर्तनें नेहमीप्रमाणें झालीं. श्री. ह. भ. प. रामचंद्र सदाशिव भट पुणें.

### प्रवचन

श्री. ह. भ. प. पांडुरंगशास्त्री गोस्वामी, पुणें.

श्री. ह. भ. प. राम गोविंद ढोलेबाबा मु. रोहणादेवी ( यवत महाल ).

श्री. ह. भ. प. डॉ. के. वी. गऱ्हाणकर मु. कुर्ला मुंबई.

### सनईवादन

श्री. मुरलीधर सोनवणे. नाशिक

श्री. दामुअण्णा दळवी, श्रीरामपूर.

### संगीत भजनें

श्री. माधवबुवा सुकाळे. पुणें. श्री. तुळशीराम दीक्षित कुर्ला.
श्री मारुतीबुवा बागडे मुंबई. सौ. मालतीबाई साळवी. मुंबई.

श्री. द. दा. नानासाहेब रासनें पुणें. श्री. गणपत विठ्ठल चाफेकर, पंढरपूर.
सौ. मिराबाई राजगोपाळ स्वामी. खार ( मुंबई )
सौ. सीतालक्ष्मी सुंदरेशन पुणें.
श्री. सत्तराम भजनी मंडळ सुरत.

## पखवाज व तबलावादन

श्री. पंडित माधव सुकाळे पुणें. श्री. बबन शेळके मुंबई.
श्री. शंकरराव सालकर, बेट कोपरगाव.

## कोजागिरी चंद्रपूजा

कोजागिरी पौर्णिमेनिमित्त सालाबाद प्रमाणें—
श्री. डॉ. के. बी. गव्हाणकर कुर्ला आणि मंडळी मुंबई.
यांचे भजन जागर, प्रवचन, संस्थानतर्फे चंद्रपूजा व तुलशी अर्चन थाटांत झालें.

## दिवाळी

सालाबादप्रमाणें श्री. लक्ष्मीपूजन, श्री. सरस्वतीपूजन साईसंस्थान तर्फे होऊन दिव्यांची रोषनाई व शोभेचें दारूकाम, फटाके, नळे, वगैरे कार्यक्रम थाटात झाले.

मुंबई येथील ५० वा श्रीपुण्यतिथी उत्सव आटोपून परत श्रींची पालखी ता. १७।१०।६८ गुरुवार रोजी शिर्डीस येऊन मिरवणूक होऊन स्थानापन्न झाली.

शिर्डी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई कांहीं नाहीं.

* * *

### आजचा सुविचार

सर्वच दिशांनीं एकाच वेळीं आत्मनियमन केलें तर तो प्रयत्न शास्त्रशुद्ध ठरेल व यशस्वीही होऊं शकेल.

महात्मा गांधी

## नकळत जडलें—

नकळत जडले मन गुरुपायीं ।
मुखीं नाम ये साई साई ॥ ध्रु ॥
नाहीं केलें ध्यान शिवाचें ।
एकादशि वा व्रत विष्णूचें ।
नाहीं पूजिलें कुलदैवत ही ॥
मन गुरुपायीं १ ॥
नाहीं आसन दिलें बसाया ।
गंध फुलें ना अर्पिलीं तया ।
अर्पियला नैवेद्य न कधिही ॥
मन गुरुपायीं २ ॥
धूप दीप तांबूल दक्षिणा ।
अर्पियली कधि नाहीं गुरुंना ।
मनोमनीं परि आठव येतां ।
संकटिं धांवे जैशी आई ॥ ३ ॥
देव्हाऱ्यांतिल देव झोपला ।
देउळांतला देवहि लपला ।
संकट समयीं हृदयिं प्रकटला,
भक्त सखा श्री साई-साई ।
न कळत जडलें मन गुरुपायीं ॥ ४ ॥

श्रीमती शांताबाई जोशी

---

### आजचा सुविचार

आपलें कर्तव्य करीत राहिलें, कीं विचार आपोआप स्फुरतात. खरें म्हणजे स्वत:चें कर्तव्य करण्याचा हक्क हा एकच हक्क असा आहे कीं, त्याच्यासाठीं जगणें आणि मरण स्वीकारणेंही सार्थ ठरेल. सर्व न्याय्य हक्कांचा त्यांत समावेश होतो.

महात्मा गांधी

## सफेद दाग से निराश क्यों ?

हमारी सुपरीक्षित आयुर्वेदिक ' अमृत बूटी'' सफेद दाग में पूर्ण लाभ पहुंचाने वाली दवा सन् १९४६ से संसार में विख्यात है। इससे सिर्फ ३ ही दिनों में दाग का रंग बदलने लगता है । इस दीर्घकाल में हजारों ने इससे लाभ उठाया है और हमें कई प्रशंसा-पत्र मिले हैं । रोग विवरण के साथ पत्र लिखकर दवा शीघ्र मंगाकर देखें कि यह कितनी तेज है। प्रत्येक रोगी को प्रचारार्थ एक फायल लगाने वाली दवा मुफ्त दी जा रही है । स्टाक सीमित है दवा जल्द मंगा लें और सुनहरे मौके से लाभ उठावें।

नोट :—नक्कालों से सावधान ।

## सफेद बाल से निराश क्यों ?

सतत् परिश्रम और खोज के बाद सुगन्धित आयुर्वेदिक ' ग्रे हाल्ट'' केश तेल हरी जडी बूटियों से बनाया गया है। यह बालों को सफेद होने से रोकता है और सफेद बालों को काले बालों में बदलने में मदद करता है। हजारों प्रशंसा-पत्र मिल चुके हैं। यदि आप बालों को काला देखना चाहते हैं तो एकबार अवश्य परीक्षा करें। मूल्य ६ रु० एकत्र तीन शीशी २५ रु०।

शंकर चिकित्सा केन्द्र

पो० कतरीसराय ( गया )

# धर्मनिरपेक्ष भारत

आमच्या कल्पनेतील राष्ट्राची कल्पना धर्मनिरपेक्ष लोकशाही राष्ट्राची आहे, असे गांधीजी म्हणत. धर्मनिरपेक्ष भारताबद्दलचे गांधीजींचे विचार पुढें दिले आहेत.

जो भारत घडविण्यासाठी मी माझे सर्व आयुष्य वेचले, त्या भारतांत प्रत्येक नागरिकाला, मग तो कोणत्याही धर्माचा असो, समान सामाजिक दर्जा उपभोगता आला पाहिजे. आमच्या कल्पनेतील आदर्श राष्ट्र, हे त्यांतील विविध घटक राज्यांमध्ये परस्पर पूर्ण सुसंवाद असलेले धर्मनिरपेक्ष, लोकशाही राष्ट्र असणे आवश्यक आहे.

काही हिंदूना आपण आता उच्च दर्जाचे नागरिक झालो आहोत असे वाटू लागले असून, काही मुसलमानांच्या मनांत आपण संघराज्यामध्ये कनिष्ठ दर्जाचे नागरिक ठरू अशी भीती निर्माण होऊ पहात आहे. ही निव्वळ शरमेची गोष्ट ठरेल. कोणत्याही अल्पसंख्य जमातीला धर्माच्या कारणावरून आपण कमी आहोत असे ज्या भारतांत वाटेल तो भारत माझ्या कल्पनेतील भारत नव्हे.

सर्व नागरिक कायद्याच्या दृष्टीने समान असणे जरूर आहे. परंतु प्रत्येक व्यक्तीला, जोपर्यंत तो देशातील कायद्याचा भंग करीत नाही, तोपर्यंत आपल्या धर्माचे अनिर्बंध आचरण करण्याचे स्वातंत्र्य त्याला असायला हवे. अल्पसंख्याकांना संरक्षण देण्याचा प्रश्न माझ्यामते योग्य नाही. कारण, त्यामुळे एकाच राष्ट्रातील नागरिकांचे धर्माधिष्ठित गट पाडण्यास मान्यता दिल्यासारखे होईल.

भारताने आपल्या प्रत्येक नागरिकाला स्वधर्माचे पालन करण्याच्या स्वातंत्र्याची हमी द्यावी असे मला वाटते. तसे केल्यानेच भारत हे एक महान राष्ट्र बनेल. ईश्वर प्राप्तीचे मार्ग अनेक असतील. परंतु ध्येय एकच व ईश्वरही एकच अशी ज्या सांस्कृतिक लोकशाहीची व्याख्या केली जाते तिला मान्यता दिलेले भारत हे कदाचित एकमेव प्राचीन राष्ट्र म्हणता येईल. किंबहुना जगांत जेवढी माणसे आहेत, तेवढे ईश्वरप्राप्तीचे मार्ग आहेत असे म्हटल्यास वावगे होणार नाही.

याउलट भारतीय संघराज्याने धर्माधिष्ठित राष्ट्र बनून, हिंदू धर्मतत्त्वे अहिंदू नागरिकांवर लादावी का, असा प्रश्न उपस्थित होतो. माझ्या मते तसे होऊ नये. तसे झाल्यास, आज आशिया व आफ्रिका खंडांतील सर्व जमाती, किंबहुना सारे जग ज्याच्याकडे आपल्या आशाआकांक्षा पूर्ण करणारा देश म्हणून डोळे लावून आहे, तसा बनण्यास भारत लायक ठरणार नाही. जगांतील जनतेला भारताकडून संकुचित मनोवृत्ती आणि धर्मवेडेपणा अपेक्षित नसून, ज्यापासून सबंध जगाला बोध घेतां येईल आणि आज सर्वत्र पसरलेल्या अंधारांतून त्याला प्रकाश दाखवू शकेल अशा थोर उदारतेची व चांगुलपणाची ते भारताकडून अपेक्षा करते.

# दक्षता आणि उदासीनता

भोळेपणा हें भक्तांचें भूषण आहे. ह्याच्याच योगानें तुकोबांचा संसार नासला असें जगाला वाटतें. पण तुकोबांनीं परमार्थशास्त्राचा म्हणजे खऱ्या अर्थशास्त्राचा, नीट अभ्यास केला होता. त्यामुळें त्यांनीं ' भोळिवेचें लेणें ' पत्करलें. भक्तांच्या लक्षणांत भगवंतांनीं 'दक्ष ' हें विशेषण घातलें आहे. तिकडे पुष्कळांनीं महाराजांचें लक्ष खेंचले असावें. पण 'दक्ष ' शब्दापुढें लागलीच ' उदासीन' शब्द गीतेंत आहे. त्याच्या मदतीनें दक्ष शब्दाचा खरा अर्थ त्यांनीं लोकांना समजावून सांगितला आहे—

**आपुला तो देह आम्हां उपेक्षित ।**
**कोठें जाऊं हित सांगों कोणा ॥ १ ॥**
**कोण नाहीं दक्ष करितां संसार ।**
**आम्हीं हा विचार वमन केला ॥ २ ॥**
**'अनपेक्षः शुचिर्दक्ष उदासीनो गतव्यथः । '**—गीता

परमार्थांत 'दक्ष' आणि संसारांत 'उदासीन' असा अर्थ समजावयाचा आहे.

**जनासी वाटे हा दुश्चित । परी तो आहे सावचित ॥**
**जयाचें असे चित्त । परमेश्वरीं ॥**—समर्थ

दया, क्षमा, शांति : दुःखितांविषयीं दया, दुर्जनांविषयीं क्षमा, आणि सर्वत्र शांति, हे विष्णुदासांचे तीन ' अभंग बाण ' आहेत आणि ईश्वरभक्ति ' कवच. '

'दक्ष' म्हटलें म्हणजें संसारांत दक्ष असा अर्थ होऊन बसावयाचा म्हणून तो अर्थ काढून टाकण्यासाठीं गीतेनें 'उदासीन' म्हणजे 'दुर्मुखलेला' असा अर्थ भासतो. तोहि नाहींसा व्हावा म्हणून 'गतव्यथः' —म्हणजे आनंद-मय—हें विशेषण जोडणें भाग पडलें. भक्ताला दुःख माहीतच नाहीं.

कारण—'वासुदेवः सर्वम्' अशी त्याची भावना आहे.

आणि त्याच कारणामुळें त्याला जग मंगल दिसतें—

**जग अमंगळ । लागे देखतां विटाळ ॥ १ ॥**
**धर्म भूतांची ते दया । संत कारण ऐसिया ॥ २ ॥**
**नव्हे माझें मत । साक्षी करूनि सांगें संत ॥ ३ ॥**
**तुका म्हणे जीवें । दावीं उमटूनि वनुभवें ॥ ४**

जो जगाला अमंगळ मानतो त्याला विटाळ लागतो. भूतांची दया हाच खरा धर्म होय आणि त्याचा धडा घालून देणें हें संतांचें काम. हें केवळ माझेंच मत आहे असें नाहीं. ह्याविषयीं संतांची साक्ष आहे' तुकाराम महाराज म्हणतात कीं, मी माझ्या अनुभवानें ही वस्तु (पुन्हां एकदां) सिद्ध करून दाखवीत आहें इतकेंच.


# मुंफ्त उपकार ।
# टेरीलीन पीस

॥ मन पसन्द रंगों में ॥

( पैंट, कमीज यां बुशशर्ट के लिए )

एक पीस का मूल्य केवल १४ ) रुपये डाक खर्च अलग । पूरे सूट के लिए केवल २५ ) रुपये । पैकिंग और डाक खर्च टिलकुल मुफ्त । एक पीस मंगाने पर एक फाउन्टन पेन और पूरे सूट का पीस मंगाने पर तीन फाउन्टेन पेन उपहार में मुफ्त । पोशाक के प्रेमी आज ही वी. पी. पार्सल के लिए लिखें क्योंकि स्टाक लिमिटेड है ।

## श्री शंकर केन्द्र

**पो०: कतरी सराय ( गया )**

# तुकोबांचे दोन अभंग

**आचार्य विनोबाकृत निरूपण**

(१)

**जाणोनि नेणतें करीं माझें मन । तुझी प्रेम-खूण देऊनियां ॥ १ ॥**
**मग मी व्यवहारीं असोनि वर्तेत । जेंवि जळाआंत पद्म-पत्र ॥ २ ॥**
**ऐकोनि नाइकें निंदा-स्तुति कानीं । जैसा कां उन्मनी योगिराज ॥ ३ ॥**
**देखोनि न देखे प्रपंच हा दृष्टीं । स्वप्नींचिया सृष्टि चेइल्या जेंवी ॥ ४ ॥**
**तुका म्हणे ऐसें जालियावांचून । करणें तो शीण वाटतसे ॥ ५ ॥**

तुझ्या प्रेमाची खूण देऊन माझ्या मनाला ज्ञानपूर्वक जड बनीव, म्हणजे मग मी खुशाल व्यवहारांत वागत राहीन. पद्म-पत्र नाहीं का जलांत राहून जलापासून अलिप्त राहत? योगिराज उन्मनी अवस्थेमध्यें ज्याप्रमाणें कोणाचें कांहीं च समजूं शकत नाहीं, तशी लोकांची सर्व निंदास्तुति ऐकत असतां हि जणूं न ऐकल्याप्रमाणें माझी स्थिति होऊं दे. स्वप्नांतली सृष्टि जागृतींत आल्यानंतर ज्याप्रमाणें न पाहिल्यासारखी होते, त्याप्रमाणें जागेपणचा प्रपंच जागेपणीं च पाहून न पाहिल्यासारखा होऊं दे. तुकाराम महाराज म्हणतात, अशी अलिप्त भूमिका प्राप्तझाल्याशिवाय कांहींच करण्याची हौस वाटत नाहीं.

भगवद्गीतेमध्यें ज्याला 'ज्ञानि-भक्त' म्हटलें आहे तसा होण्या-विषयींची उत्कंठा ह्या अभंगांत दर्शविली आहे.

(१) जाणोनि नेणतें—

ही भाषा अशीच अनेक अभंगांत आढळून येते :—

> **'वर्ते समाधानी जाणोनि नेणता ।'**
> **'जाणोनि नेणते जाले तेणें सुखें ।**
> **न बोलोनि मुखें बोलताति ।'**—श्रुति
> **'पाण्डित्यं निर्विद्य बाल्येन तिष्ठासेत ।'**

अर्थ : ज्ञानाचा कंटाळा करून, किंवा ज्ञान पचवून, बाल-भावानें रहावें.

जाणतेपणा म्हणजे ज्ञान, नेणतेपणा म्हणजे भक्ति. जाणून नेणतेपणा म्हणजे ज्ञान-भक्ति.

**" जनीं ' जाणता भक्त ' होऊनि राहे " ।--समर्थ**
**'बहु भितों जाणपणा । आड न यो नारायणा ।**
**घेईन प्रेम-पान्हा । भक्ति-सुख निवाडें ॥ '**

ज्ञान-भक्तीची कल्पना महाराष्ट्रीय संतमंडळाचे आचार्य ज्ञानेश्वर महाराज ह्यांनींच सर्वांना शिकविली आहे---

**' माझिये सहज-स्थिती । भक्ति नाम ॥ '**
**' जे नेणणें माझें प्रकाशोनि । अन्यथात्वें मातें दावूनि ।**
**सर्व हि सर्वीं भजोनि । बुझावीतसे ॥**
**एवं घेऊन अज्ञानातें । माझी भक्ति जे हे वर्ते ।**
**ते दावी मज द्रष्ट्यातें । दृश्य करूनि ॥ '**
**' ऐसा बोध चि केवळ ! जो होऊन असे निष्कळ ॥**
**तया हि वरी भजन-शीळ । माझां ठाईं ' ॥**
**' कैवल्याचा अधिकारी । मोक्षाची सोडी-बांधी करी ॥**
**कीं जळाचिया परी । तळवट घे ॥ ' इ.**---ज्ञानदेव

प्रेम व सुख अनुभवण्यासाठीं, आणि जगाला वांटण्यासाठीं ज्ञान विसरावयाचें.

**अभेदूनि भेद राखियेला अंगीं । वाढवाया जगीं प्रेम-सुख ॥**

( २ ) ' जाणोनि नेणता बनणें ' ह्याचा ईश्वराला जाणून पुन्हां नेणता बनणें हा एक अर्थ झाला. पण जगांतले व्यवहार जाणत असून न जाणणें हा दुसरा अर्थहि त्याचा होऊं शकतो. आणि पुढें दिलेला पद्म-पत्राचा दृष्टान्त त्याच अर्थानें लागू करावयाचा आहे. योग्याच्या अवस्थेला ' उन्मनी ' म्हणतात. भक्ताच्या अवस्थेला ' सहज-स्थिति ' हें नांव आहे. उन्मनी-मध्यें सृष्टीची ओळखच नाहीं. सहज-स्थितीमध्यें ओळख असून ओळख नाहीं. ' उन्मनी ' विशिष्ट काळापुरती आहे. ' सहज-स्थिति ' निरंतरची आहे. उन्मनी ही ज्ञान-भूमिका आहे. सहज-स्थिति ही त्याच्या पुढची भक्ति-भूमिका आहे.

**भूतीं देव म्हणोनि भेटतों या जनां । नाहीं हे भावना नर-नारी ॥ १ ॥**
**जाणे भाव पांडुरंग अंतरींचा । न लगे द्यावा साचा परिहार ॥ २ ॥**
**दयेसाठीं केला उपाधि-पसारा । जड जीवा तारा नाव कथा ॥ ३ ॥**
**तुका म्हणे नाहीं पडत उपवास । फिरतसें आस धरोनियां ॥ ४ ॥**

मी ह्या लोकांना भेटतों तो ‘ देव ’—भावनेनें भेटतों. हा पुरुष, ही स्त्री असली भेद-बुद्धि माझ्या जवळ नाहीं. अंतःकरणांतला भाव ईश्वराला माहीत आहे. सत्याला आपला बचाव करीत बसण्याची जरूर नाहीं. मी ही सारी उपाधि कां वाढवून ठेवली आहे ?— जडजीवांची दया येते म्हणून. जडजीवांना तारणारी हरि—कथा ही नौका आहे. म्हणून मी हरि-कथेचा ‘ पसारा ’ घालतों. नाहीं तर ह्या भानगडींत मी कशाला पडलों असतों ? तुकाराम महाराज म्हणतात, हा मी एवढा आशा धरून भटकत फिरतों, कीर्तनाचा पसारा घालतों, ज्याला त्याला भेटतों, तें आपलें मला उपवास पडत होते म्हणून करतों असें समजतां कीं काय ?

( १ ) ‘ भूतीं देव म्हणोनि भेटलों ह्या जनां ’—

‘ जें जें भेटे भूत । तें तें मानिजे भगवंत ।
‘ हा भक्ति-योग निश्चित । जाण माझा ॥ ’ —ज्ञानदेव
‘ तुका म्हणे जें जें भेटे । तें तें वाटे मी ऐसें ॥ ’
‘ भूतीं भगवंत । हा तो जाणतों संकेत ॥ ’
‘ भूत—मात्रीं हरीविण । न पाहेचि दुजेपण ॥ ’

( १ ) ‘ नाहीं हे भावना नर-नारी ’

‘ नर नारी बाळें अवघा नारायण । ऐसें माझें मन करीं देवा ॥ ’
‘ त्वं स्त्री त्वं पुमानसि । त्वं कुमार उत वा कुमारी ॥
‘ त्वं जीर्णो दण्डेन अञ्चसि । त्वं जातो भवसि विश्वतोमुखः ॥’—श्रुति

तूं स्त्री आहेस, तूं पुरुष आहेस, तूं च मुलगा आणि तूं च मुलगी, तूं च म्हातारा बनून हातांत काठी घेऊन चालतोस. आणि बालकरूपानें तूं च जन्माला येतोस. असा तूं विश्व-व्यापक आहेस.

( ३ ) ‘ जाणे भाव ’ इ०—

ह्यांत महाराजांनीं आपल्या म्हणण्याच्या सत्यत्वाबद्दल पांडुरंगाची साक्ष दिली आहे—

कळावें तयासि कळे अंतरींचें ।

‘ परिहार ’ म्हणजे बचाव किंवा आत्मसमर्थन.

सत्याला समर्थनाची अपेक्षा नाहीं.

( ४ ) ‘ दयेसाठीं ’ उपाधि—

संतांचा उद्योग, ‘ पसारा ’ भूतदयेनें प्रेरित असतो.

‘ भूतांची दया हें भांडवल संतां । ’
‘ अवतार तुम्हां धराया कारण ।
उद्धरावे जन जड जीव ॥ ’

तुकाराम महाराजांना लोकांविषयीं फार कळवळा वाटे. त्यामुळें ‘ सकळांच्या पायां माझे दंडवत ’ येथपासून तों ‘ तुका म्हणे त्याच्या हाणा तोंडावरी ’ येथपर्यंतची भाषा त्यांनीं वापरली आहे. अंतर्बाह्य पांडुरंगमय झालेल्या सत्पुरुषाचा हा ‘ स्वभाव-सिद्ध ’ अधिकार आहे––

जन तरी आम्हां देव । परि हा निंदितो स्वभाव ॥
येतो हिताचा कळवळा । पडती हातीं म्हणोनि काळा ॥

ह्या सर्व -भूता- हिताच्या कळवळ्यानें त्यांनीं जन्मभर उपाधि पतकरली. उपाधि कसली ?—हरिकथेची.

( ५ ) ‘ जड जीवा तारा नाव कथा—
दीन आणि दुर्बळांसी । सुख-राशि हरि-कथा ।। १ ।।
तारूं भव-सागरींचें । उंच नीच अधिकारी ।। २ ।।
चरित्र तें उच्चारावें । केलें देवें गोकुळीं ॥ ३ ।।
तुका म्हणे आवडी धरी । कृपा करी म्हणऊनि ॥ ४ ॥

( ६ ) शेवटच्या चरणांत ‘ आमचें कांहीं ह्या उद्योगावांचून अडलें नाहीं,’ असा इशारा नमूद केला आहे. माप भरल्यानंतर बाहेर सांडणें स्वाभाविकच आहे.

तुका म्हणे माप भरूं आलें सिगे । धारबोळ गंगे पूर वाहे ॥

AN HUMBLE SERVICE
IN MEMORY OF BABA'S 50th ANNIVERSARY

**SAI PRASAD**

(IN KANNADA)

BY SAU.

KAMALADEVI GUNAKI
AND
BASAVARAJ GUNAKI

(Price: Rs. 2-00)

Write To: Secretary, SAI SAMAJ,
THALAKWADI BELGAUM

**Books published and Sold by Sai Baba Sansthan, Shirdi**

## श्री साईबाबा संस्थान, शिरडी संस्थेतर्फे प्रकाशित व विक्रीकरितां ठेवलेलीं पुस्तकें

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (१) | श्रीसाईसच्चरित्र | (मराठी) | श्री. दाभोळकरकृत | ८-०० |
| (२) | ,, | (हिंदी) | श्री. ठाकूर | ४-५० |
| (३) | ,, | (गुजराथी) | श्री. सोमपुरा | ४-०० |
| (४) | ,, | (इंग्रजी) | Shri Gunaji | ४-०० |
| (५) | ,, | (Kannad) | N. S. Anantha Raum | ३-०० |
| (६) | Glimpes of Indian Spirituality-by Pradhan | | | १-०० |
| (७) | Glimpes of Indian Spirituality (Telgu) | | | १-०० |
| (८) | श्री साईलीलामृत | (मराठी) | श्री. आगास्करकृत | २-०० |
| (९) | साईबाबा-अवतार व कार्य | (मराठी) | श्री. धोंड | २-०० |
| (१०) | साईबाबांचे ४ अध्याय | (मराठी) | श्री. दासगणू | ००-५० |
| (११) | सगुणोपासना | (मराठी) | श्री. भीष्म | ००-२५ |
| (१२) | ,, | (गुजराथी लिपींत) | श्री. भीष्म | ००-२५ |
| (१३) | श्री रुद्राध्याय ११ वा | (मराठी) | श्री. दाभोळकर | ००-१२ |
| (१४) | कीर्तन पंचक | (मराठी) | श्री. देव | १-५० |
| (१५) | शीलधी | (मराठी) | डॉ. गव्हाणकर | ००-७५ |
| (१६) | श्री साईगीतांजलि | (मराठी) | कवि श्रीपाद | ००-१२ |
| (१७) | Guide to Shirdi (English) | | | ००-१२ |
| (१८) | स्तवनमंजिरी व सुमनांजली | (मराठी) | | ००-२० |

**व्ही. पी. ची पद्धत नाहीं.**

**Colour pictures of Sai Baba by Neroy**

| | | |
|---|---|---|
| (1) | Baba sitting on Stone 9½" × 13½" medium | 00-37 |
| (2) | ,, ,, in Dwarkamai 9½" × 13½" medium | 00-50 |

Other different poses of Sai baba in colour according to different sizes varying in prices.

Commission to Sellers 25% except on 2 to 10 for which only 25 nP. and 50 nP. for No. 1 Postage Extra (minimum durchase of Rs. 15). *Can be had from* (मागवा) :

1. **Receiver Shri Sai Baba Sansthan,**
   P. O. Shirdi., Dst. Ahmednagar.

2. **Sai Baba Office 'Sai Niketan,'**
   Dr. Ambedkar Road, Dadar, Bombay 14.